# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | बुधवार | दि. १२ ऑगस्ट २०२६ | अंक ६७| पृष्ठे ८ | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in


### सुनावणी निर्णायक वळणावर!

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्षचिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात निर्णायक वळणावर पोहोचली आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना विधिमंडळातील आमदारांची फूट म्हणजे थेट राजकीय पक्षात फूट नव्हे, असा ठाम दावा केला. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला अधिकृत शिवसेना मानून धनुष्यबाण चिन्ह दिल्याच्या निर्णयावरही सिब्बल यांनी प्रश्न उपस्थित केले. शिवसेनेत फूट पडली, असा निष्कर्ष आयोगाने नेमका कसा काढला? असा सवाल त्यांनी केला.

### मुंबईत रक्षाबंधनला शासकीय सुट्टी

**मुंबई :** यंदाच्या वर्षी मुंबई शहर आणि उपनगरात गोपाळकाला (दहीहंडी) सणाऐवजी रक्षाबंधन सणाला शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय मंगळवारी जारी करण्यात आला. शनिवार, ५ सप्टेंबर रोजी गोपाळकाला आहे, तर रक्षाबंधन शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी आहे. गोपाळकाल्याऐवजी रक्षाबंधनाच्या दिवशी सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांना सुट्टी असेल, असे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. या निर्णयामुळे तमाम बहिणींमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.




# फैसला सरकारचा, घोषणा गोगावलेंची!

## गोगावलेंचा दावा; रायगडच्या पालकमंत्रीपदाचा फैसला होणार



### ...अखेर वाद मिटला?

महायुती म्हणून राज्याच्या सत्तेत एकत्रित असले तरीही रायगडमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये विस्तवही जात नसल्याचं चित्र आहे. राष्ट्रवादीचे खासदार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेना नेत्यांचा वाद हा नेहमीचाच मुद्दा या ठिकाणच्या राजकारणात आहे. सुनील तटकरे यांनी आपली कन्या, आदिती तटकरे यांच्या पालकमंत्रीपदासाठी जोरदार फिल्डिंग लावली. त्याचवेळी शिवसेनेच्या जिल्ह्यातील तीनही आमदारांनी हे पद आपल्याकडेच राहावं यासाठी जोरदार प्रयत्न केले आहेत.

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

विधान परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे यांना केलेल्या मदतीच्या बदल्यात राष्ट्रवादीकडून रायगडच्या पालकमंत्रीपदावरील दावा सोडला जाणार असल्याची राजकीय चर्चा सुरू होती. त्यातच आता मंत्री भरत गोगावले यांच्या ताज्या वक्तव्यामुळे रायगडच्या पालकमंत्रीपदाचा अनेक महिन्यांपासून सुरू असलेला तिढा अखेर सुटण्याच्या मार्गावर असल्याचे संकेत मिळाले आहेत. रायगडच्या पालकमंत्रीपदाचा अधिकृत निर्णय होण्याआधीच 'मीच पालकमंत्री' असा दावा केल्याने गोगावलेंना नेमका कोणता हिरवा कंदील मिळाला, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

आजच तिढा संपणार असून, संध्याकाळपर्यंत माझ्या नावाची घोषणा होईल, असा दावा भरत गोगावले यांनी केला आहे. एवढेच नव्हे, तर यंदाच्या १५ ऑगस्टला रायगडच्या पालकमंत्रीपदाच्या नात्याने आपणच ध्वजारोहण करणार, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, गोगावलेंच्या या दाव्यानंतरही राजकीय चर्चेला पूर्णविराम मिळालेला नाही. तटकरे आपला शब्द पाळणार की पुन्हा गोगावलेंच्या दाव्याला सुरुंग लागणार,

पान २ वर

### ध्वजारोहणाचा मान मलाच; गोगावलेंना आत्मविश्वास

रायगडच्या पालकमंत्रीपदाची घोषणा आज होणार असून, आपलं नाव निश्चित करण्यात आलं आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यामध्ये त्यावर चर्चा झाली आहे. त्यानुसार आज संध्याकाळपर्यंत आपल्या नावाची पालकमंत्री म्हणून घोषणा केली जाणार आहे. यंदाच्या १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणाचा मान आपल्यालाच मिळणार असून, पालकमंत्री म्हणूनच आपण ध्वजारोहण करणार असल्याचा दावा भरत गोगावले यांनी केला.

# अदानीवर सरकार मेहरबान

## सिमेंट प्रकल्पासाठी वनजमीन वर्ग



| रायगड | प्रतिनिधी |

भाजप सरकार अदानी समूहावर मेहरबान असल्याचा प्रत्यय रायगडकरांना अनुभण्यास मिळाला. राज्य सरकारने अदानी समूहाशी संबंधित कंपनीच्या प्रकल्पासाठी रायगड जिल्ह्यातील वनजमिनी वळविण्याचा शासन निर्णय जारी केला आहे. रायगड जिल्ह्यात अदानी सिमेंटेशन लिमिटेडच्या सिमेंट बल्क टर्मिनलसाठी ०.६४९७ हेक्टर वनजमीन वळविण्यात आली. एकीकडे अदानी समूहाच्या प्रकल्पांसाठी राज्य सरकारकडून आवश्यक जमीन तात्काळ उपलब्ध करून दिल्या जात आहेत, तर दुसरीकडे आदिवासींच्या वनहक्क दाव्यांवर निर्णय देण्यास विलंब लावताना दिसत आहे.

महसूल व वन विभागाने १० ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शासन आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील शहापूर, शाहबाज गावात अदानी सिमेंटेशन लिमिटेडकडून रायगड सिमेंट बल्क टर्मिनल प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी बर्थिंग जेट्टी, कन्व्हेयर कॉरिडॉर, बॅकअप सुविधा आणि जोडरस्ता उभारण्यासाठी ०.६४९७ हेक्टर वनजमीन वळविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. हाप्रस्तावयापूर्वीकेंद्राच्यापर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता.

अदानी समूहाशी संबंधित कंपनीच्या प्रकल्पासाठी वनजमिनीशी संबंधित शासन निर्णय जारी झाला. राज्य सरकारकडून समूहाच्या विविध पायाभूत प्रकल्पांना प्रशासकीय पातळीवर वेगाने मार्ग मोकळा करून दिला जात आहे. सिमेंट टर्मिनलसाठी समुद्रकिनारी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन दिल्या गेल्या आहेत. अदानी समूहाच्या प्रकल्पासाठी निर्णय झाल्याने राज्य सरकारकडून अदानी समूहाच्या प्रकल्पासाठी आवश्यक शासकीय प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून जमीन उपलब्ध करून देण्याची भूमिका पार पाडली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील शहापूर आणि शहाबाज गावांच्या

पान २ वर

## वे|ध|क

### घोडागाडीच्या धडकेत पर्यटक जखमी

**रायगड :** चालत्या घोडागाडीच्या धडकेत पर्यटक महिला गंभीर जखमी झाली. ही घटना रविवारी सायंकाळी अलिबाग समुद्र किनारी घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सोनल मेढेकर असे या महिला पर्यटकाचे नाव आहे. सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी या महिला त्यांच्या कुटुंबियांसमवेत अलिबागमध्ये फिरण्यासाठी आले होते. रविवारी सायंकाळी समुद्रकिनारी फेरफटका मारत असताना चालत्या घोडागाडीची त्यांना धडक लागली. त्यामध्ये पर्यटक महिलेला गंभीर दुखापत झाली. याप्रकरणी घोडागाडी चालक-मालक वैभव खोत यांच्या विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिक्षा चालकाला हेल्मेटने मारहाण

**नवीन पनवेल :** रिक्षा थांबवल्याचा राग मनात धरून स्कुटीवरील दोघांनी रिक्षाचालकाला दगडाने आणि हेल्मेटने मारहाण केल्याची घटना सहा ऑगस्ट रोजी बालाजी कॉम्प्लेक्ससमोरील रोड कळंबोली येथे घडली. याप्रकरणी १० ऑगस्ट रोजी सुजान खान, कौशल खान यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास रिक्षाचालक ऋषिकेश राठोड हे मुंब्रा पनवेल हायवेने बालाजी कॉम्प्लेक्स समोरील रोड कळंबोली येथे प्रवासी भाडे सोडण्यासाठी थांबले होते. पाठीमागे पिकअप वाहन आणि त्याच्या पाठीमागील स्कुटीने ठोकर मारल्याने मनात राग होता.

### बैलाची कत्तलप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

**नवीन पनवेल :** बैलाची कत्तल करून तीन बैलांना बेशुद्ध केल्याप्रकरणी सोहेल रियाज काझी, अकिब दावलकर आणि बिलाल गुलाम मोहम्मद (रा. तळोजा गाव) आणि इतर दोन अनोळखी इस्माविरोधात १० ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सकाळी साडेसहाच्या सुमारास पेंधर फाटा रेल्वे ब्रिज आणि एल अँड टीचे काम सुरू असलेल्या इमारतीच्या दरम्यान बिलाल गुलाम मोहम्मद पटेल यांच्या भंगारच्या दुकानाच्या मागे शेडमध्ये सोहेल काझी, अकिब दावलकर, बिलाल पटेल आणि दोन अनोळखी इसमांनी बैलाची कत्तल केली होती.

# महिलेला प्रसूतीकळा, डॉक्टरचा कानाडोळा!

| पेण | प्रतिनिधी |

प्रसूतीकळांनी महिला अक्षरक्षः विव्हळत असताना डॉक्टरांनी वेळेत रुग्णालयात येऊन तपासणी केली नाही, असा गंभीर आरोप महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान, प्रसूतीकळा असह्य झालेल्या महिलेची सुदैवाने सुखरुप प्रसूती झाली. परंतु, त्यानंतरही वाद थांबला नाही. प्रसूतीनंतरच्या उपचारावरुन ऑनड्युटी नर्ससोबत असभ्य वर्तन करुन तिला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. पेण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणाबाबत संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरांविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.



- वेळेत तपासणी न केल्याचा आरोप
- प्रसूतीनंतर नर्सला शिवीगाळ, मारहाण
- पेण उपजिल्हा रुग्णालयातील घटनेने खळबळ

मिळालेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास गौरी देवजी कडू या प्रसूतीसाठी पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या. त्यावेळी ऑनड्युटी असलेल्या नर्सने स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कृष्णा सोनावणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर नियमानुसार सुरक्षा कर्मचाऱ्यांमार्फत डॉक्टरांना लेखी कॉल पाठविण्यात आला. आरोपानुसार, लेखी कॉल देऊनही डॉ. सोनावणे रुग्णाला तपासण्यासाठी रुग्णालयात आले नाहीत. उलट रुग्णाला अलिबाग येथे हलविण्याचा निरोप देण्यात आला. त्यानुसार ऑनड्युटी डॉक्टर मराठे यांनी रुग्णाला पुढे हलविण्याची प्रक्रिया सुरू केली. मात्र, दरम्यानच्या काळात प्रसूतीकळा वाढल्याने रुग्णाची रुग्णालयातच प्रसूती करणे आवश्यक झाले.

यानंतर पुन्हा पान २ वर

# भरपावसात पाण्यासाठी आक्रोश

## चेंढरे ग्रामस्थांचा ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा



(छायाचित्र : समीर मालोदे)

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यामध्ये पाऊस पडून धरणे, तलाव पाण्याने तुडूंब भरून गेले आहेत. मात्र, भरपावसात अलिबाग तालुक्यातील चेंढरेमध्ये पाण्याचा दुष्काळ आहे. गेली महिन्याभरापासून पाण्यासाठी वणवण करणाऱ्या ग्रामस्थांच्या समस्यांकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी भरपावसात पाण्यासाठी आक्रोश केला. दत्ता ढवळे यांच्या नेतृत्वाखाली पिंपळभाट स्थानक ते ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत हंडा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात ग्रामस्थ, महिला व तरुणवर्ग मोठ्या संख्येने सहभागी होऊन ग्रामपंचायतीच्या कारभाराच्या निषेधार्थ घोषणा दिल्या.

### प्रशासन अधिकारी गायब

चेंढरे ग्रामस्थ पाण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याची आगाऊ सूचना ग्रामपंचायतीच्या प्रशासन अधिकारी यांना दिली होती. मात्र, मंगळवारी निवेदन देण्यासाठी ग्रामस्थ कार्यालयात गेल्यावर निर्णयक्षम अधिकारी नसल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. काहीही करा आम्हाला पाणी द्या, अशी सक्त ताकीद दिली. अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा दत्ता ढवळे यांनी दिला.

यावेळी हर्ष ढवळे, संदीप ढवळे, अ‍ॅड. परेश देशमुख, बी.एस. पाटील, अविनाश राणे, प्रकाश किनगे, प्रिया ढवळे, नागेश्वरी हेमाडे, सायली ढवळे, सुगंधा ढवळे, आरती तांबे, श्रीकांत गायकवाड, पंडीत ढमेढरे, सुरेश काकड, अतुल जाधव, सुधाकर भोसले, अशोक काकडे,

पान २ वर

# माथेरानमध्ये रात्रीच्या वेळी ई-रिक्षाचालकाची मनमानी!



- स्थानिक तरुणीला उद्धट उत्तरे
- पर्यटकांसाठी रिक्षा, मात्र स्थानिक मुलीला नकार

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये ई-रिक्षांची संख्या कमी असल्याची चर्चा सुरू असतानाच, स्थानिक तरुणीला रात्रीच्या वेळी रिक्षा सेवा नाकारल्याचा प्रकार समोर आला आहे. रिक्षाचालकाने तरुणीला उद्धट उत्तरे दिल्याचा आरोप असून, अखेर तक्रारीची भाषा केल्यानंतर रात्री साडेदहा वाजता तिला रिगल नाका येथे सोडण्यात आले.

शिवसेना महिला आघाडीच्या शहर संपर्क संघटक प्रीती कळंबे यांची कन्या प्रिया कळंबे या ८ ऑगस्ट रोजी रात्री पुण्याहून माथेरानच्या दस्तुरी नाका येथे पोहोचल्या. त्या मधुमेहाच्या रुग्ण असून, रात्री एकट्याने पुढे जाणे सुरक्षित नसल्याने त्यांनी ई-रिक्षाचालकाकडे रिगल नाका येथे सोडण्याची विनंती केली.

पान २ वर

### कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पर्यटकाचा मृत्यू

| रोहा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील धगडवाडी गावच्या हद्दीत कुंडलिका नदीपात्रात राफ्टिंग करत असताना बोट पाण्यातील झाडाला अडकून कलंडल्याने मुंबईतील एका तरुण पर्यटकाचा बुडून मृत्यू झाला होता. ही दुर्दैवी घटना ११ जुलै रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली होती. महिना उलटूनही याप्रकरणात कोणावरही गुन्हा दाखल न झाल्याने पोलिसांच्या तपासकार्यावर तरुणाच्या कुटुंबियांनी संशय व्यक्त केला होता. दरम्यान, या प्रकरणात पर्यटनावेळी कर्तव्यात कसूर आणि जबाबदारीत

पान २ वर

# राष्ट्रगीताआधी वाजणार 'वंदे मातरम्'!

- शासकीय कार्यक्रमांसाठी नवी नियमावली
- राष्ट्रीय गीताला विशेष सन्मान देण्याची तरतूद

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

शासकीय कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' दोन्ही गायले जाणार असल्यास 'वंदे मातरम्' प्रथम गायले जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६'ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय गीताच्या गायनासंदर्भात नियमावली निश्चित केली असून, त्यात कार्यक्रमातील प्राधान्यक्रम स्पष्ट करण्यात आला आहे.

यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून वंदे मातरम्चे गायन केले जाणार आहे. अधिकृत कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम्ची सर्व सहा कडवी गायली जातील. यासाठी ३ मिनिटे १० सेकंदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

कोणत्याही शासकीय कार्यक्रमात राष्ट्रगीत (जन-गण-मन) आणि राष्ट्रीय गीत एकत्र वाजवले किंवा गायले जाणार असल्यास, वंदे मातरम् प्रथम गायले जाईल.

'वंदे मातरम्'ला 'जन गण मन'प्रमाणेच सन्मान आणि कायदेशीर संरक्षण देण्याच्या दिशेने केंद्र सरकारने पावले उचलली आहेत. राष्ट्रीय गीत सुरू असताना उपस्थितांनी सावधान स्थितीत उभे राहण्याचे निर्देशही नियमावलीत करण्यात आले आहेत.

नवीन कायद्यानुसार, वंदे मातरम्चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला तीन वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान एक वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

### पेणमध्ये मटका माफिया सक्रिय

| पेण | प्रतिनिधी |

पेण शहर व परिसरात पुन्हा एकदा मटका जुगाराचा अवैध धंदा सक्रिय झाल्याचे पोलिसांच्या कारवाईतून समोर आले आहे. कंवडातळे परिसरात मटक्याचे आकडे घेत असलेल्या एका व्यक्तीला पेण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून रोख रक्कम व मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महिनाभरापूर्वी मटक्याचे आकडे घेत असताना खलील नामक व्यक्तीला गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली होती. या कारवाईदरम्यान मटका घेणाऱ्या गणेश गायकर नामक व्यक्तीचे नाव समोर आले होते. त्यानंतरही शहर व परिसरात मटका जुगार सुरू पान २ वर

**नगराध्यक्षा अक्षया नाईक यांचा पुढाकार** | **एमआरएफ सेंटर ते वैकुंठ स्मशानभूमी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड**

# अलिबागच्या हरित विकासाला नवी दिशा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी|

अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या पुढाकाराने अलिबाग शहरामध्ये हरित विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शहरातील एमआरएफसेंटरतेवैकुंठस्मशानभूमी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवडीचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. हरित विकासाला चालना देणाऱ्या या उपक्रमातून परिसराचे सौंदर्यीकरण करण्यासोबतच भविष्यात या मार्गाला हिरवाईची नवी ओळख मिळणार आहे.




यावेळी उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, सभापती अनिल चोपडा, मुख्याधिकारी सागर साळुंखे, नगरसेविका अश्विनी ठोसर, अ‍ॅड. ऋषिकेश माळी, निवेदिता वाघमारे, आनंद पाटील, जमाल सय्यद, समीर ठाकूर यांच्यासह अन्य नगरसेवक, नगरपरिषद कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "अलिबागचा विकास करताना केवळ भौतिक सुविधा निर्माण करणे हा आमचा उद्देश नाही, तर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि हिरवेगार करण्यावरही आमचा भर आहे. आज लावलेले प्रत्येक रोप हे उद्याच्या अलिबागच्या पर्यावरणाची गुंतवणूक आहे. त्यामुळे वृक्षलागवडीसोबतच या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्यालाही आम्ही प्राधान्य देणार आहोत."
>
> – अक्षया नाईक, नगराध्यक्षा, अलिबाग नगरपरिषद

एमआरएफ सेंटर ते वैकुंठ स्मशानभूमी हा महत्त्वाचा मार्ग असून, या मार्गाच्या दुतर्फा वृक्षलागवड झाल्याने परिसराचे सौंदर्य वाढण्याबरोबरच पर्यावरणीय समतोल राखण्यासही मदत होणार आहे. वाढते शहरीकरण आणि बदलते पर्यावरणीय आव्हान लक्षात घेता शहराच्या विकास आराखड्यात हरित उपक्रमांना स्थान देणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून वृक्षलागवडीसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी वृक्षलागवडीचा पुढाकार पान २ वर

# पावसाची हजेरी, शेतकरी सुखावला

## बुधवारी जिल्ह्यात यलो अलर्टचा इशारा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भातलागवडीची कामे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असून, आतापर्यंत सुमारे ६० टक्के लागवड पूर्ण झाली आहे. मात्र, पावसाने दडी मारल्याने लागवडीच्या कामांना अपेक्षित गती मिळत नव्हती. अखेर दीर्घ प्रतीक्षेनंतर मंगळवारी जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. दिवसभर पावसाची रिपरिप सुरू राहिल्याने शेतकरी सुखावला आहे. बुधवारीही पावसाचा अंदाज असून, हवामान विभागाने यलो अलर्टचा इशारा दिला आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

यंदा पाऊस सुमारे पंधरा दिवस उशिरा दाखल झाल्याने भातलागवडीची कामेही जवळपास एक महिना लांबली. कधी ऊन तर कधी पाऊस, अशा वातावरणामुळे शेतकरी चिंतेत होता. दुबार पेरणी केलेली रोपे लागवडीयोग्य होण्यास अडथळे निर्माण झाले होते. तयार झालेल्या रोपांसाठी शेतांमध्ये पुरेसे पाणी नसल्याने लागवड लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती.

अखेर मंगळवारी (दि. ११) सकाळी अकरानंतर जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. सकाळपासून सुरू पान २ वर

# भातलावणी महिनाभर लांबली!

## ५३ हजार ७१० हेक्टरवर लागवड

## ऑगस्ट अखेरपर्यंत कामे पूर्ण होण्याची कृषी विभागाला आशा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

यंदाच्या अतिवृष्टीने रायगड जिल्ह्यातील भातशेतीचे वेळापत्रकच विस्कटले आहे. जून-जुलैमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे भात पेरणीला मोठा फटका बसला, तर तब्बल महिनाभर उशिराने भातलागवडीला सुरुवात झाली. सुमारे १५ हजार हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेल्याने राबांचे नुकसान झाले आणि अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यामुळे लागवड लांबल्याने भात उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्ह्यात आतापर्यंत ५३ हजार ७१० हेक्टर क्षेत्रावर भात लागवड पूर्ण झाली असून, ६० टक्क्यांपेक्षा अधिक कामे झाली आहेत.



रायगड जिल्ह्यात साधारणपणे जूनमहिन्याच्यापहिल्याआठवड्यात पावसाला सुरुवात झाल्यानंतर भात पेरणीची कामे सुरू होतात. जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून भात लागवडीला वेग येतो आणि जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत बहुतांश लागवड पूर्ण होते. मागील वर्षी जुलै महिन्यापर्यंत जिल्ह्यात सुमारे ७० हजार हेक्टर क्षेत्रावर भातलागवड झाली होती. मात्र, यंदा जूनच्या शेवटच्या आठवड्यात सुरू झालेल्या पावसाने जुलैच्या पहिल्याच आठवड्यापासून रौद्ररूप धारण केले. धरणे, शेतजमिनी आणि भातखाचरे पाण्याने भरून गेल्याने भातशेतीचे मोठे नुकसान झाले.

अतिवृष्टीमुळे सुमारे १५ हजार हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले. राबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पुन्हा दुबार पेरणी करून पीक उभे करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही कधी पाऊस तर कधी ऊन अशा बदलत्या हवामानामुळे लागवडीयोग्य रोपे तयार होण्यास विलंब झाला. परिणामी, नेहमीच्या वेळेपेक्षा तब्बल एक महिना उशिराने भात लागवडीला सुरुवात झाली.

सध्या जिल्ह्यातील शेतकरी भात लागवडीच्या कामात व्यस्त असून, आतापर्यंत ५३ हजार ७१० हेक्टर क्षेत्रावर भात लागवड पूर्ण झाली आहे. ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत उर्वरित लागवडीची कामे पूर्ण होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. मात्र, उशिराने झालेल्या लागवडीचा पिकाच्या वाढीवर, उत्पादनावर आणि अंतिम उत्पन्नावर किती परिणाम होतो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

> “अतिवृष्टीमुळे यंदा भात लागवड एक महिना उशिरा झाली आहे. जिल्ह्यात ६० टक्क्यांपेक्षा अधिक लागवडीची कामे पूर्ण झाली आहेत. साधारणतः भात, नाचणी, तूर व इतर पिके धरून सुमारे ५५ हजार हेक्टर क्षेत्रावर पिकांची लागवड झाली आहे. त्यापैकी ५३ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर भात लागवड झाली आहे. ऑगस्ट महिन्यात ही लागवड पूर्ण होईल, असा विश्वास आहे.”
>
> – प्रवीण थिगळे, उपसंचालक, कृषी विभाग

# पूलदुरुस्तीसाठी आणखी १५ दिवसांची प्रतीक्षा!

## ■ खानाव पुलाचे काम अजूनही संथगतीने

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील खानावजवळील पुलाला भगदाड पडून एक महिना उलटला. या भगदाडात पडून एका वयोवृद्धाचा मृत्यूही झाला. मात्र, अद्याप पुलाचे काम पूर्ण झालेले नसल्याने या मार्गावरील प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पर्यायी मार्गामुळे प्रवाशांवर आर्थिक भुर्दंडही पडत आहे. आता पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी १५ दिवस लागणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग-रोहा मार्गावरील खानावजवळील अरुंद पुलाचे दोन वर्षांपूर्वी रुंदीकरण करण्यात आले होते. गेल कंपनीच्या अवजड वाहनांची वाहतूक करण्यासाठी हा पूल नव्याने बांधण्यात आला होता. मात्र, अवघ्या दोन वर्षांतच या पुलाची दुरवस्था झाल्याचे समोर आले. मागील जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीदरम्यान सोमवारी (दि. ६) दुपारी पुलाला मोठे भगदाड पडले. त्यामुळे बांधकाम विभागाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या पुलाला भगदाड पडल्याने या कामाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली. नागाव-पाल्हे पुलाकडून मोठ्या वाहनांची वाहतूक, तर खानाव व वेलवली गावातून लहान वाहनांसाठी पर्यायी मार्ग देण्यात आला. मात्र, पुलाच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना न झाल्याचा फटका एका वयोवृद्धाला बसला. रात्रीच्या वेळी भगदाडात पडून पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. भगदाड पडून आठ दिवस झाले तरी बांधकाम विभागाच्या दुरुस्तीच्या कामाला अपेक्षित गती दिसून आली नाही. गेल्या काही दिवसांपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, कामादरम्यान विविध अडचणी निर्माण होत असल्याने दुरुस्तीचे काम संथगतीने सुरू आहे. पुलाला भगदाड पडून एक महिना उलटला तरी काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, जादा पैसे मोजून प्रवास करण्याची वेळ आली आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असून, रविवारी ठोकळे टाकण्याचे काम करण्यात आले.

## पान १ वरून

### फैसला सरकारचा, घोषणा गोगावलेंची!

याकडे रायगडच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अधिकृत घोषणा होईपर्यंत पालकमंत्रीपदाचा तिढा खरोखरच सुटला, असे म्हणणे घाईचे ठरणार आहे.

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर येऊन जवळपास पावणेदोन वर्षे उलटली, तरी रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न बराच काळ प्रलंबित राहिला आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून शिवसेनेचे भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे यांच्यातील राजकीय रस्सीखेच चर्चेत राहिली. महायुतीतील अंतर्गत समीकरणांमुळे या पदाचा निर्णय लांबणीवर पडल्याचे बोलले जात होते. आता मात्र गोगावलेंनीच तिढा संपला असा दावा केल्याने नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे पालकमंत्रीपदाचा सौदाफ नेमका कुणाच्या बाजूने झाला आणि १५ ऑगस्टला रायगडच्या ध्वजारोहणाचा मान कुणाला मिळणार, याची उत्सुकता वाढली आहे.

या सगळ्या घडामोडीनंतर आता भरत गोगावले यांनी केलेल्या दाव्याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदासंबंधी कोणतीही अधिकृत घोषणा झाली नसली तरी गोगावलेंच्या दाव्याम ध्ये किती सत्यता आहे, हे काहीच वेळात समजेल. तसेच जर रायगडच्या पालकमंत्रीपदाचा निर्णय झाला असेल, तर नाशिकच्याही पालकमंत्रीपदाबाबत लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

**अनिकेत तटकरेंना आमदारकी**

दोन महिन्यांपूर्वी राज्यातील विधान परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. त्यामध्ये सुनील तटकरे यांचं सुपुत्र अनिकेत तटकरे हे आमदार झाले. मात्र, त्याआधी ही जागा आपल्यालाच मिळावी, आपलेच मतदार सर्वाधिक असल्याचा दावा शिवसेनेने केला होता. मात्र, वरिष्ठ स्तरावर झालेल्या तडजोडीअंती, शिवसेनेने माघार घेत या ठिकाणी राष्ट्रवादीच्या अनिकेत तटकरेंचा मार्ग मोकळा केला. मात्र, या आमदारकीच्या बदल्यात रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी तटकरे यांनी तडजोड केल्याची चर्चा त्यावेळी होती.

### महिलेला प्रसूतीकळा, डॉक्टरचा कानाडोळा!

डॉ. सोनावणे यांच्याशी संपर्क साधण्याचा तसेच लेखी कॉल पाठविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र ते रुग्णालयात आले नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अखेर रुग्णाचे नातेवाईक डॉक्टरांना बोलावण्यासाठी गेले असता त्यांच्याशी कथितरित्या शिवीगाळ व असभ्य वर्तन करण्यात आले आणि रुग्णालयात येण्यास नकार देण्यात आल्याचा आरोप आहे. दरम्यान, रुग्णाची प्रसूती झाली. त्यानंतर डॉ. सोनावणे रुग्णालयात आले. प्रसूतीनंतर रुग्णाला टाके घालण्याची जबाबदारी डॉक्टरांची असताना त्यांनी संबंधित नर्सला टाके घालण्यास सांगितले आणि तिच्याशी शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच संबंधित नर्सने मोबाईलवर घटनेचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न केला असता डॉक्टरांनी छत्रीने तिच्या हातावर मारल्याचा आणि असभ्य भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या घटनेनंतर संबंधित नर्सने पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार शुभ्रा शिरगावकर या पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, पेण उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक ज्ञानेश्वर अरसळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की दोन्ही कर्मचाऱ्यांशी स्वतंत्रपणे चर्चा केल्याशिवाय नेमके काय घडले हे सांगता येणार नाही. घटनेची माहिती घेऊन वरिष्ठांना कळिवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या घटनेमुळे पेण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांच्यातील समन्वयाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी होत आहे. तर पिडीत निर्स ने कृषीवल शी संवाद साधताना सांगताना सांगितले की, प्रामाणिकपणे काम करुन ही अशा प्रकारचा त्रास होत असेल तर आम्ही नक्की काम करायचे की नाही असा प्रश्न उद्‌भवत आहे. वरिष्ठांकडून जर आम्हाला सुरक्षततेची हमी नसेल तर या पुढे काम करणे कठीण होईल.

### कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पर्यटकाचा मृत्यू

हलगर्जीपणा केल्यामुळे कोलाड पोलिसांनी बोटिंग कंपनीतील गार्ड आणि जीव रक्षक या दोन कामगारांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या रोहा तालुक्यातील धगडवाडी येथे कुंडलिका नदीत बोटीतून राफ्टिंग करीत असताना बोट पाण्यातील झाडाला अडकून कलंडली. यावेळी बोटीतील दोरी मयत तरुण पर्यटक मनोज कुमार अमर नाथ यांच्या पायात अडकली. त्यामुळे सदर तरुण पाण्यात पडून बुडाला आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कोलाड पोलीस ठाण्यात याबाबत आकस्मिक गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेनंतर बोटिंग कंपनीत काम करणाऱ्या कामगारांच्या आणि कंपनी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आपल्या मुलाला जीव गमावावा लागला. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करून आम्हला न्याय द्यावा, अशी मागणी मृत तरुणाची आई जानकी देवी अमर सिंह नाथ यांनी लेखी पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली होती.

या लेखी पत्रानंतर शासकीय यंत्रणा खऱ्या अर्थाने कामाला लागली. महिनाभरानंतर कोलाड पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवली व घटनेत दोषी असणाऱ्या गणपती बच्चनसिंह रावत (२८, रा. रॉकहिल्स रिसॉर्ट, मूळ रा. उत्तरखंड) गाईड व राजू रामबहादूर परियार (४३, रॉक हिल्स रिसॉर्ट, मूळ राहणार नेपाळ (जीवरक्षक) या कामगारांविरोधात कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु, अद्यापही त्यांना अटक झालेली नाही. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक भारत फारने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी भोजकर करीत आहेत. गुन्हा दाखल व्हायला एक महिना का लागला, असा सवाल मृत तरुणाच्या कुटुंबियांनी व्यक्त केला असून, आमच्या मुलाला न्याय मिळायला हवा, अशी मागणी केली आहे. कुटुंबियांनी कोलाड पोलिसांच्या तपासावर संशय व्यक्त केला असून, याबाबत लवकरच पोलीस अधीक्षक आचल दलाल यांची भेट घेणार असल्याचे सांगितले आहे.

### अलिबागच्या हरित विकासाला नवी दिशा

घेण्यात आला. शहरातील विविध विकासकामांसोबतच पर्यावरणपूरक उपक्रमांवर भर देत हरित आणि सुंदर अलिबाग घडविण्याच्या दिशेने नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. विकासासोबत पर्यावरण हा दृष्टिकोन पुढे नेत नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नागरी सुविधांसोबतच स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले.

वृक्षलागवडीनंतर या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही महत्त्वाची ठरणार असून, लावलेल्या प्रत्येक रोपाचे भविष्यातील झाडात रूपांतर झाले तरच या उपक्रमाचा खरा उद्देश साध्य होणार आहे. त्यामुळे अक्षया नाईक यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या हरित उपक्रमाकडे आता त्याच्या सातत्यपूर्ण संगोपनाच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. शहराचा विकास केवळ रस्ते, दिवे आणि नागरी सुविधांपुरता मर्यादित न ठेवता पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देण्याच्या भूमिकेतून अलिबाग नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते मंगळवारी एमआरएफ सेंटर ते वैकुंठ स्मशानभूमी मार्गाच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### अदानीवर सरकार मेहरबान

परिसरातून प्रस्तावित अदानी समूहाच्या सिमेंट प्रकल्पाला स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि राजकीय प्रतिनिधींकडून तीव्र विरोध होत आहे. रायगडमधील अलिबागजवळील खाडी व महसूल क्षेत्रातील प्रस्तावित सिमेंट बल्क टर्मिनल, जेट्टी प्रकल्पासाठी नुकतीच वनजमिनीची परवानगी दिली गेल्याने स्थानिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

### भरपावसात पाण्यासाठी आक्रोश

तानाजी कदम, अविनाश राणे आदी ग्रामस्थ, महिला उपस्थित होत्या. चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील पिंपळभाट, सुजलाम नगर, गुरव नगर, कृष्णदर्शन सोसायटी, संकुल सोसायटी, स्वामी समर्थ नगर या परिसरात सुमारे दोन हजारांहून अधिक लोकसंख्या आहे. मात्र, गेल्या महिन्याभरापासून या परिसरातील घरात पाणीच पोहोचत नाही. पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाल्याची तक्रार ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा करण्यात आली. मात्र, त्याची कार्यवाही ग्रामपंचायतीमधील प्रशासन विभागाकडून करण्यात आली नाही.

अखेर चेंढरेतील ग्रामस्थ व महिलांनी एकत्र येत मंगळवारी (दि.११) सकाळी ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. महिलांनी डोक्यावर रिकामा हंडा घेत ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत तीव्र निषेध व्यक्त केला. भरपावसात पाण्याची समस्या निर्माण होऊन त्याची कार्यवाही झाली नसल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

**पाण्याची यंत्रणा सक्षम करण्यास अपयशी**

अलिबाग शहरालगत असलेल्या चेंढरे ग्रामपंचायतीचा विस्तार होत आहे. गेल्या दोन वर्षापासून ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकीय राजवटीमार्फत चालविला जात आहे. मात्र ग्रामपंचायत हद्दीतील खड्डेमय रस्त्यांचा प्रश्न सोडविण्यास प्रशासन अपयशी ठरले आहे. ग्रामपंचायतीच्या अधिकारात असताना विकास कामे करण्यास टाळाटाळ केली जात आहे. चेंढरे परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. नवीन घरे आणि वसाहती वाढत असताना पाणीपुरवठ्याची यंत्रणा सक्षम करण्यास प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला.

ऐन पावसाळ्यात डोक्यावर हंडा

पाणी टंचाईमुळे चेंढरेमधील नागरिक त्रस्त झाले आहे. विशेष करून महिला वर्गात संताप निर्माण झाला आहे. पाणी ही मूलभूत गरज असूनही त्यासाठी नागरिकांना आंदोलन करावे लागत असेल तर ग्रामपंचायत प्रशासन नेमके काय करत आहे, असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला. पावसाळ्यातही पाण्यासाठी हंडा घेऊन आंदोलन करण्याची वेळ आल्याची संतप्त भावना महिलांनी व्यक्त केली.

### पेणमध्ये पुन्हा मटकामाफिया सक्रिय

असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कंवडातळे येथे कारवाई करत ज्ञानेश्वर तुकाराम पवार याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे मटक्याचे आकडे घेण्यासाठी वापरला जाणारा मोबाईल आढळून आला. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपीकडून १ हजार ८०० रुपये रोख रक्कम तसेच सुमारे ५ हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल, असा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे.पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, पेण शहरातील विविध व्यक्तींकडून पैसे स्वीकारून त्यांना ‘कल्याण’ नावाच्या अवैध जुगाराचे आकडे देण्यात येत असल्याचे समोर आले आहे. दिवसभरात जमा होणारी जुगाराची रक्कम मुकणे पूर्ण नाव माहिती नाही, रा. कल्याण याच्याकडे दिली जात असल्याची माहितीही तपासात समोर आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे पेण शहरात मटका जुगाराचे जाळे पुन्हा सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले असून, या प्रकरणामागे आणखी कोणकोण व्यक्ती कार्यरत आहेत, तसेच या अवैध व्यवसायाचे सूत्रधार कोण आहेत, याचा तपास पेण पोलीस करीत आहेत. प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### माथेरानमध्ये रात्रीच्या वेळी ई-रिक्षाचालकाची मनमानी!

मात्र, पर्यटकांना घेऊन जाण्यास प्राधान्य देत चालकाने स्थानिक तरुणीला रिक्षा देण्यास नकार दिल्याचा आरोप आहे.

प्रिया यांनी घरच्यांना माहिती देत रिक्षा व चालकाचे छायाचित्र पाठविले. पोलिसांत तक्रार करण्याची भाषा केल्यानंतर चालकाने अखेर त्यांना रिगल नाका येथे सोडले. यावेळी चालकाने उद्धटपणे बोलल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

माथेरानच्या स्थानिक मुलीला रात्री अशा प्रकारचा त्रास होऊ नये. रिक्षा संघटनेने या प्रकाराची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रीती कळंबे यांनी केली आहे. दरम्यान, रात्री ई-रिक्षा सेवा कोणत्या नियमांनुसार सुरू असते आणि स्थानिकांना सेवा नाकारून पर्यटकांकडून अधिक भाडे घेतले जात असल्यास त्यावर परिवहन विभाग काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

### पावसाची हजेरी, शेतकरी सुखावला

झालेला पाऊस संध्याकाळपर्यंत कायम होता. पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली असली तरी अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पाऊस सुरू झाल्याने शेतकरी मात्र सुखावला. त्यामुळे भातलागवडीच्या कामांना आता वेग येण्याची शक्यता आहे. बुधवारीही जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज असून, १५ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# ‘पोषणशक्ती’ योजनेतील कर्मचाऱ्यांनाही न्याय द्या!

## ■ श्रीवर्धनच्या कंत्राटी ऑपरेटरांची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ‘समग्र शिक्षा अभियान’मध्ये दहा वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या ३ हजार २७६ कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील ‘अधिसंख्य पदे’ निर्माण करून सेवासुरक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत होत असतानाच, ‘प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजने’तील कंत्राटी डेटा एंट्री ऑपरेटर कर्मचाऱ्यांनीही सेवासुरक्षेसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. शासनाने भेदभाव न करता आम्हालाही सेवेत समाविष्ट करून समान न्याय द्यावा, अशी मागणी श्रीवर्धन येथील कर्मचाऱ्यांनी केली आहे.

राज्यातील शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांच्या पोषण आहार योजनेची महत्त्वाची जबाबदारी हे ऑपरेटर अनेक वर्षांपासून सांभाळत आहेत. ऑनलाइन माहिती नोंदविणे, अहवाल तयार करणे तसेच धान्याची नोंद ठेवण्यासह महत्त्वाची कामे करूनही त्यांना अल्प मानधनावर कंत्राटी तत्त्वावर काम करावे लागत आहे. वाढत्या महागाईच्या काळात या तुटपुंज्या मानधनातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

“एकाच शासनाच्या दोन विभागांतील कर्मचाऱ्यांमध्ये असा भेदभाव का? समग्र शिक्षेतील कर्मचाऱ्यांना दहा वर्षांच्या सेवेच्या आधारावर अधिसंख्य पदे देऊन वेतन संरक्षण मिळत असेल, तर आमच्यावरच अन्याय का?” असा संतप्त सवाल कर्मचाऱ्यांनी केला आहे. ‘समग्र शिक्षा’प्रमाणेच ‘पोषणशक्ती’ योजनेतील ऑपरेटर कर्मचाऱ्यांनाही तात्काळ सेवासुरक्षा देऊन समान न्याय करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण**

**‘समग्र शिक्षा’च्या निर्णयामुळे आमच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. शासनाच्या महत्त्वाच्या योजनेचे काम वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे करूनही मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनावर सध्याच्या महागाईत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने विलंब न करता ‘पोषणशक्ती’ योजनेतील सर्व कंत्राटी ऑपरेटर कर्मचाऱ्यांना सेवासुरक्षा देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी श्रीवर्धन येथील कर्मचाऱ्यांनी केली आहे.**

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आदेश मुरलीधर चांदुरकर, अनघा मदन देशपांडे, मदन देविदास देशपांडे, श्री. निलेश वसंत म्हात्रे सर्व रा. मु. पो. नागांव ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली मिळकत मी खालील सही करणार यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा ठराव विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | २५३२ | ०-११-४० | ३.३१ |

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन मी खालील सही करणार वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करीन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०८/२०२६

सही/-
**श्री. चिंतामण सदाशिव म्हात्रे**
पत्ता : रा. सागरकन्या, दिपीका फार्म,
कनकेश्वर फाटा, पो. नवेदर नवगाव, ता. अलिबाग,
जि. रायगड.फोन : ९८५०५४४६८८, ७०३०२०९६४३

**जाहीर सुचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मांडवे तर्फे बामणगाव व मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती श्री. अशोक पांडुरंग पाटील, राहणार बागमळा, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अशोक पांडुरंग पाटील यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगाव, ता. अलिबाग. | ५१/५ | ०-०६-०० एकूण | ०-३१ |
| बागमळा, ता. अलिबाग. | १२१/४ | ०-००-८०<br>०-००-२० पो.ख.<br>०-०१-०० एकूण | ०-०२ |

अलिबाग,
दिनांक : ११/०७/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड. खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-भानसोली, ता.कर्जत, जि.रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील श्री. विजय अनंता पाटील, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक नंदू वाळकू मोहिते, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे - भानसोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| भानसोली | ३०/१/ड | ०.३६.९० | १.०० |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. १२/०८/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत
दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

**जमीन विकत घेणार, आमचे अशील,**
**श्री. विजय अनंता पाटील, यांचा मोबाईल नंबर - ९८२००६१३१२**

**जाहीर नोटीस**

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो., यांचे न्यायालयांत**

ज.म.र.अर्ज नं.७७/२०२६

मुजम्मिल अब्दुलमजीद पांगारकर ... अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म दि. १६/०६/१९८२ रोजी गांव-विहूर, ता. मुरुड, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची जन्म नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत विहूर, ता. मुरुड, जि. रायगड कार्यालय यांचे गा.न.नं. १४ जन्म मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी मा. तहसिलदार सो., तहसिल कार्यालय मुरुड यांच्या नांवे अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांचा जन्म दि. १६/०६/१९८२ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि. २५/८/२०२६ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची जन्म नोंद जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७/८/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा,**

## निवडक



### स्मारक दालनाच्या सुशोभीकरणाला सुरुवात

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिरवी पाटील यांचे स्मारक कर्जत पंचायत समिती कार्यलयात आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि दोन्ही हुतात्म्यांच्या मूर्ती असलेले हे दालने गळके आणि मळके बनले होते. याबाबत आवाज उठवल्यावर पोलीस मित्र संघटनेने दि.१५ ऑगस्टची डेडलाईन देत हुतात्मांचे दालन सुशोभित करण्याची मागणी केली होती. तर, कर्जत पंचायत समितीचे माजी सभापतती अमर मिसाळ यांनी दोन दिवसांत सुशोभीकरणाच्या कामे सुरु झाली नाहीत तर आपण स्वखर्चाने सुशोभीकरण करणार, असा इशारा दिला होता. त्यानंतर गटविकास अधिकारी यांच्या देखरेखीत दालनाच्या सुशोभीकरणाच्या कामाची सुरुवात झाली आहे. दरम्यान, कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी हुतात्मा दालनाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. हुतात्म्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि त्यांच्या त्यागाची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे दालन उभारण्यात आले होते. यावेळी सुरू असलेल्या कामाची पाहणी करताना त्यांनी दालनाचे काम नियोजनानुसार आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. हुतात्म्यांच्या स्मृतींना उजाळा देणारे हे दालन कर्जतच्या सामाजिक व ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी महत्त्वाची भर पडणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### कर्नाळा खिंडीत मंकी जाळी रस्त्यावर

**पनवेल :** कर्नाळा खिंडीत एका अवजड वाहनाने मंकी जाळीला धडक दिल्याने दोन्ही बाजूंचे लोखंडी पोल वाकून जाळी रस्त्यावर आली. या घटनेमुळे दोन्ही दिशेची वाहतूक विस्कळीत होऊन मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेनंतर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलिसांचे पथक तसेच पळस्पे वाहतूक शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पोलिसांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून रस्त्यावर आलेली मंकी जाळी बाजूला करण्याचे काम हाती घेतले. त्यानंतर वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली. पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे काही वेळातच वाहतूक सुरळीत करण्यात यश आले.



### मोक्ष भांगरे जिल्ह्यात पाचवा

**नागोठणे :** कोएसोच्या बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील कै.अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी मधील विद्यार्थी मोक्ष भांगरे हा शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्ह्यात पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याने या परीक्षेत ८५.३३ टक्के गुण मिळविले असून, त्याचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे. मोक्ष भांगरे या विद्यार्थ्याला शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा लोखंडे, वर्गशिक्षक राहुल भवर, शिक्षिका राजश्री जाधव, विजया पिंगळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच, त्याचे बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुल शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन, प्राथमिक विभाग शाळा समितीचे अध्यक्ष अनिलशेठ काळे, सदस्य जयराम पवार, सुभाष जैन, ॲड. सोनल जैन यांनी अभिनंदन केले आहे.

### पीक स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन

**चिरनेर :** शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून पिकांची उत्पादकता वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत ''खरीप हंगाम २०२६'' अंतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिक स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. पिक स्पर्धे साठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. उरण तालुक्यात ही स्पर्धा खरीप हंगामातील भात पिकासाठी होणार आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांनी दिली. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावावर जमीन असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्यास एकापेक्षा अधिक पिकांसाठी अर्ज करता येणार असून, भातासाठी किमान २० गुंठे, तर नाचणीसाठी किमान ४० गुंठे सलग लागवड क्षेत्र असणे बंधनकारक आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. या स्पर्धेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी उरणच्या सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची मदत घेण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

**स्थानिक शेतकऱ्यांचा कामाला विरोध | मोजणी करून मोबदला देण्याची मागणी**

# भूसंपादन न करताच रस्त्याचे रुंदीकरण

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ-कळंब राज्यमार्गावर सार्वजनिक बांधकाम खात्याकडून रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण काम सुरु आहे. या रस्त्याचे भूसंपादन शासनाने केलेले नाही आणि त्यामुळे आमचा रस्त्याच्या कामाला विरोध आहे. आमच्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला द्या आणि खुशाल रस्त्याचे काम सुरु करा, असे आव्हान येथील शेतकऱ्यांनी केले आहे. दरम्यान, रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण करण्यासाठी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात वाहनचालकांचा प्रवास खड्ड्यातून सुरु आहे.

नेरळ-कळंब रस्त्याच्या रुंदीकरण व काँक्रीटीकरणाचे काम सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एमएसआयडीसीकडून सुरु आहे. मात्र, रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त जागेचे भूसंपादन न करताच शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर केला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, या अन्यायाविरोधात आगरी समाज संघटनेकडे पत्र देऊन संघटने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या जागेची शेतकऱ्यांच्या उपस्थितीत योग्य पद्धतीने मोजणी करून, कायदेशीर भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करावी आणि त्यानंतरच रस्त्याचे काम करण्यात यावे, अशी मागणी संबंधित विभागाकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून या निवेदनाची दखल घेतली जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



**वाहनचालक त्रस्त**

रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण करण्यासाठी खोदकाम करण्यात आले आहे. त्या खोदकामामुळे आणखी खड्डे पडले आहेत. परिणामी रस्त्यावरून वाहतूक करणे धोकादायक झाल्यामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर रस्त्याचे रुंदीकरण सुरु आहे. मात्र, या रस्त्यासाठी जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाने मोबदला दिलेला नाही. त्याबाबत आगरी समाज संघटनेने बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता यांच्याशी बोलून मार्ग काढण्याची मागणी शेतकऱ्यांनी पत्राद्वारे केली आहे. रस्त्यासाठी जमीन शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे आर्थिक मोबदला द्यावा आणि एकदा कामे करून गेले की कोणी तिकडे लक्ष देत नाही. २०१७ मध्ये रस्त्याचे रुंदीकरण करताना भुसंपादनाचा प्रस्ताव करून तुम्हाला मोबदला देऊ, असे आश्वासन मिळाले होते. मात्र, शासनाने अद्याप कोणताही मोबदला दिला नाही. रस्ता हा ३.७० मीटर लांबीचा होता आणि तो साडे पाच मीटरचा बनविला जात आहे. त्यामुळे आम्हला शासनाने मोबदला द्यावा आणि खुशाल रस्त्याचे काम करावे, असे विनंती केली आहे. तर आम्ही शासनाला कोणत्याही कामाला विरोध करीत नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देऊन रस्त्याचे अर्धवट काम पूर्ण करावे, अशी सूचना शेतकरी सूर्यकांत चंचे यांनी केली आहे.

## खारकांड मोहल्ल्यातील रस्त्याची दुरवस्था

| महाड | प्रतिनिधी |

महाड शहरातील खारकांड मोहल्ला येथील कवे आली कॉर्नर ते देशमुख नर्सिंग हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, या रस्त्यावरून चालणे कठीण झाले आहे. पाण्याच्या पाईपलाईनचे काम केल्यानंतर हा रस्ता नीट न बुजवल्यामुळे ही भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात जमातुल मुस्लिमीन खारकांड मोहल्ल्याचे अध्यक्ष मुख्तार अकबर अली तरे यांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला असून त्वरित रस्ता दुरुस्तीची मागणी केली आहे.

या भागात पाण्याच्या पाईपलाईनचे काम करण्यात आले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदार आणि प्रशासनाने रस्त्याची योग्य प्रकारे डागडुजी केली नाही. पूर्वी या रस्त्यावर खड्डे होतेच, मात्र पाईपलाईनच्या कामानंतर आता हा संपूर्ण रस्ताच खड्डेमय झाला आहे.



रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच, देशमुख नर्सिंग हॉस्पिटलकडे येणाऱ्या रुग्णांना आणि गरोदर महिलांना या खडतर प्रवासाचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ''प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे खारकांड मोहल्ल्यातील नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. जर या खड्ड्यामुळे एखादा मोठा अपघात झाला किंवा कोणाचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासन घेणार का?'' असा संतप्त सवाल जमातुल मुस्लिमीनचे अध्यक्ष मुख्तार अकबर अली तरे यांनी केला आहे. प्रशासनाने कोणताही वेळ न घालवता हा रस्ता युद्धपातळीवर दुरुस्त करावा, अन्यथा नागरिकांना घेऊन नगरपरिषदेवर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## टँकर नको, नळाला पाणी हवं!




### पाणीटंचाईवरून नागरिक आक्रमक

| पनवेल | प्रतिनिधी |

पावसाळा सुरू असूनही पनवेल महापालिका क्षेत्रातील पाणीटंचाईचे संकट कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. तळोजा, कामोठे, कळंबोली आणि खारघर परिसरात अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, विविध भागांत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, ''टँकर नको, नळाला पाणी हवं!'' या घोषपत्रांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

तळोजातील आनंदसागर आणि सुखसागर इमारतीतील रहिवाशांनी ''पाणी द्या, अन्यथा सदनिका परत घ्या'' अशी भूमिका घेत रस्त्यावर उतरून आंदोलन केले. नियमित नळजोडणीने पाणी मिळत नसल्याने टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याचा संताप महिलांनी व्यक्त केला. इमारतीच्या नावात ''सागर'' असला तरी पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत त्यांनी मांडली. कामोठे परिसरातही पाणीपुरवठ्याची स्थिती चिंताजनक असून, परिस्थितीत सुधारणा न झाल्यास स्वातंत्र्यदिनापासून आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे. यावेळी कळंबोलीतील नागरिकांनी सिडकोच्या पाणीपुरवठा कार्यालयात धडक देत पुरेसे पाणी कधी मिळणार? याचा जाब देखील अधिकाऱ्यांना विचारला. पनवेल महापालिकेचे स्वतःचे धरण नसल्याने महापालिका क्षेत्र एमजेपी आणि नवी मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून आहे. एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पाणीकपात लागू केल्यानंतर येथील परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. दरम्यान, वनमंत्री गणेश नाईक यांनी मोरबे धरणातून पनवेलला कायमस्वरूपी पाणी देणे शक्य नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर या प्रश्नाला राजकीय रंग चढला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खारघर दौऱ्यावर असताना पनवेलच्या विकासाचा आराखडा मांडला; मात्र, पाणीटंचाईच्या गंभीर प्रश्नावर भाष्य न केल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### ६३ वर्षीय व्यक्ती बेपत्ता

| पनवेल | प्रतिनिधी |



पनवेल तालुक्यातील पळस्पे येथून ६३ वर्षीय हरिश्चंद्र पाटील हे बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. ते पळस्पे येथील रहिवासी आहेत. त्यांचे वय ६३ वर्षे असून, उंची सुमारे ५.५ फूट, रंग निमगोरा, नाक सरळ व चेहरा गोल आहे. त्यांना कपाळावर जखमेची खूण असून ते चष्मा वापरतात. त्यांच्या अंगावर काळ्या रंगाची पँट व पांढऱ्या रंगाचा शर्ट असल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे.

## पाणीपुरवठ्याची श्वेतपत्रिका जाहीर करा

**भरत पाटील यांची मागणी**

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

सिडको आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, नवीन बांधकामे आणि त्यातून निर्माण होणारी पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, सिडको व पनवेल महानगरपालिकेने पाणीपुरवठ्याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि पनवेल महानगरपालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

सिडको व पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पावसाळ्यासारख्या मुबलक पाण्याच्या काळातही पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचा मुद्दा पाटील यांनी उपस्थित केला आहे. शहरातील जलस्रोतांची सध्याची स्थिती काय आहे, किती पाणी उपलब्ध आहे, त्याचे वितरण कशा पद्धतीने केले जाते, गळतीमुळे किती पाण्याची नासाडी होते आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत, याची स्पष्ट माहिती नागरिकांसमोर येणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सिडको व पनवेल परिसरातील उपलब्ध पाणीपुरवठ्याची क्षमता लक्षात घेऊनच नवीन बांधकामांना परवानगी देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या इमारती आणि गृहसंकुलांनाच पुरेसा पाणीपुरवठा होत नसताना भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणी कसे उपलब्ध करून दिले जाणार, याचे नियोजन आतापासून करणे गरजेचे आहे. याबाबत सिडको व महापालिका प्रशासनाने पारदर्शक भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

### 'ड्रग्स मुक्त रायगड' अभियानाची सुरुवात

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनीतील पिल्लई एचओसी एज्युकेशनल कॅम्पसमध्ये रायगड पोलिसांनी आयोजित केलेल्या 'कॅम्पस कनेक्ट ड्रग्स मुक्त रायगड' अभियानाचा शुभारंभ मंगळवारी (दि.११) जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या उपस्थितीत करण्यात आला. हे अभियान जिल्ह्यात सर्वत्र राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. यावेळी डॉ. आंचल दलाल म्हणाल्या की, पुढील पिढी उद्ध्वस्त होण्यापासून वाचवण्यासाठी देशात 'ड्रग्स फ्री इंडिया' ही मोहीम राज्यासह जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. ड्रग्सचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांचे सातत्याने प्रयत्न सुरू असून, तरुणाई या विळख्यात सापडून त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सर्वत्र नशामुक्ती अभियान राबविण्यात येत आहे. त्यांनी यावेळी एनडीपीएस कायद्यांतर्गत विविध कलमांची माहिती देत नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, डॉ. जगदीश बाकल, किशोर पाटील, संदिप पाटील, अमर मांगे, अनंता ठोंबरे पाटील यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

### अनोळखी व्यक्तिचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील लाईफ लाईन हॉस्पिटलसमोरील पुलाखाली अंदाजे ३५ ते ४० वर्षांचा एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. या व्यक्तिचे अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून रंग गहूवर्णीय, चेहरा गोल, उंची सुमारे ५ फूट २ इंच आणि बांधा सडपातळ आहे. केस काळे-पांढरे असून, त्याने पांढऱ्या पट्टे असलेला गुलाबी रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### आरटीओच्या दलालीविरोधात आंदोलन

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल येथील आरटीओ परिसरात ''एडीसी'' नावाखाली कथितपणे सुरू असलेल्या अनधिकृत दलाली, नागरिकांची दिशाभूल आणि आर्थिक गैरव्यवहारांविरोधात दि.१९ ऑगस्ट रोजी खारघर येथील सेक्टर-३६ मधील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शहबाज पटेल यांनी दिली. त्यांनी सांगितले की, या प्रकरणी प्रशासनाकडे अनेक वेळा लेखी तक्रारी, निवेदने आणि स्मरणपत्रे सादर करण्यात आली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई अथवा समाधानकारक अहवाल न मिळाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या हितासाठी आरटीओ कार्यालयातील कामकाज पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त आणि दलालमुक्त करण्याच्या मागणीसाठी आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**प्रमुख मागण्या**

''एडीसी'' नावाखाली सुरू असलेल्या अनधिकृत दलालीची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, आरटीओ कार्यालयातील सर्व कामकाज पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने करण्यात यावे, सर्व कक्षांमध्ये उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच नागरिकांसाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करावी.

### दुचाकीची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

शहरातील शिवाजीनगर झोपडपट्टी येथे उभी करून ठेवलेली सुमारे ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष चिडालीया (२४) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यांची यामाहा कंपनीची एफझेडएस ही दुचाकी चोरीला गेली आहे. या दुचाकीचा रंग पांढरा असून तिचा क्रमांक एमएच-४६-सीक्यू-२४८१ हा आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सुनील वाघ करीत असून, चोरट्याचा शोध सुरू आहे.

**५४ लाखांच्या निधीअभावी लाभ रखडला | समाजकल्याण विभागाची शासनाकडे मागणी**

# विवाह अनुदानासाठी १०८ जोडपी प्रतीक्षेत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

समाजातील जातीय भेद कमी करून आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेला रायगडमध्ये निधीअभावी ब्रेक लागला आहे. जिल्ह्यातील १०८ पात्र जोडप्यांना तब्बल ५४ लाख रुपयांच्या अनुदानाची प्रतीक्षा असून, समाजकल्याण विभागाने निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

समाजातील अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव कमी करून सामाजिक सलोखा वाढावा, या




उद्देशाने शासनाकडून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक मदत दिली जाते. या योजनेंतर्गत पात्र जोडप्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान, तर २०१० पूर्वी विवाह केलेल्या पात्र जोडप्यांना १५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. या रकमेपैकी ५० टक्के निधी केंद्र सरकार, तर उर्वरित ५० टक्के निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जातो. जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ मिळण्यासाठी रायगडमधील १०८ पात्र जोडपी प्रतीक्षेत आहेत. ४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध नसल्याने २०२६-२७ या आर्थिक वर्षातील लाभार्थ्यांना अद्याप अनुदान मिळू शकलेले नाही. मागील वर्षात शासनाकडून १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यातून २५० लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ देण्यात आला. मात्र, यंदा १०८ जोडप्यांसाठी आवश्यक ५४ लाख रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

**आंतरजातीय विवाह योजना कोणासाठी?**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील एक व्यक्ती आणि सवर्ण हिंदू, जैन, लिंगायत किंवा शीख धर्मातील दुसरी व्यक्ती यांच्यात विवाह झाल्यास योजना लागू. ६ ऑगस्ट २००४ च्या शासन निर्णयानुसार मागास प्रवर्गातील आंतरप्रवर्गीय विवाहांनाही योजनेचा लाभ.

**योजनेसाठी आवश्यक अटी**

लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विवाहित जोडप्यांपैकी एक व्यक्ती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावी. वैध जात प्रमाणपत्र आणि विवाह नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक. विवाहावेळी वराचे वय किमान २१ वर्षे व वधूचे १८ वर्षे पूर्ण असावे. शाळा सोडल्याचे दाखले, दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारस आणि जोडप्याचा संयुक्त छायाचित्र आवश्यक.

## वाढीव ई-रिक्षा सुरू होणे अशक्यच

| माथेरान | प्रतिनिधी |

हातरीक्षा सारख्या अतिकष्टदायक कामातून श्रमिकांना कायमस्वरूपी मुक्ती मिळून त्यांनाही सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठी ई-रिक्षा हाच एकमेव पर्याय उपलब्ध आहे. याकामी हातरीक्षा चालक मालक संघटनेने जवळपास बारा वर्षांपेक्षा अधिक काळ शासन, प्रशासन त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधी या सर्वांकडे याबाबत आपली कैफियत मांडली होती. परंतु, त्यास किंचितही यश मिळाले नाही. त्यासाठी संघटनेने सुप्रीम कोर्टाचे उंबरठे झीजवले. त्यावेळी सुप्रीम कोर्टाने सनियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांना आदेश दिले होते. येथे एकूण ९४ हातरीक्षा



परवानाधारक असून, मागील दोन वर्षांपूर्वी फक्त २० ई-रिक्षांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, पर्यटन वाढत असताना या रिक्षा कमी पडत आहेत.

दरम्यान, श्रमिकांच्या पुढाकाराशिवाय वाढीव ई-रिक्षा सुरू होणे अशक्यच असल्याचे ई-रिक्षा समर्थकांमधून बोलले जात आहे. उर्वरित ७४ परवानाधारक हातरीक्षा मालकांनी सनियंत्रण समिती, आमदार, खासदार वा अन्य कुणालाही दंडवत घालण्याची आवश्यकता नसून, ही लढाई तुमची आहे. तुम्ही सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार ई-रिक्षा सुरू केल्या आहेत. तसे पत्र देखील असल्याने बिनधास्तपणे टप्प्याटप्प्याने ई-रिक्षा आणून सुरू कराव्यात. जो कोणी विरोध करेल, मग तो प्रशासकीय अधिकारी असो किंवा अन्य कुणीही त्यांना सुप्रीम कोर्टाचे पत्र दाखविण्यात यावे. त्यामुळे आडकाठी आणणाऱ्याना सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची गरज आता या श्रमिकांना भासत असल्याचे देखील स्थानिक ई-रिक्षा समर्थक बोलत आहेत.

# दिल्ली आणि रांची

दिल्लीतील जंतरमंतरप्रमाणेच झारखंडची राजधानी रांचीमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन उभे केले आहे. सतरा दिवसांच्या आंदोलनानंतर सोमवारी विधानभवनावर मोर्चा नेण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी काही ठिकाणी लाठीमार झाला व अश्रुधूर सोडण्यात आला. शांततामय आंदोलनावर पोलिसी हिंसेचा प्रयोग कुठेही झाला तरी त्याचा निषेधच करायला हवा. आंदोलक म्हणजे आपले शत्रू आहेत अशाच रीतीने पाहण्याचे ट्रेनिंग पोलिसांना दिले गेलेले असते हा सर्व राजकीय कार्यकर्त्यांचा नेहमीचा अनुभव आहे. त्यामुळे संधी मिळताच ते लाठ्या चालवायला आणि गोळीबार करायला तयार असतात. शिवाय, सत्तेत बसलेली मंडळी कोणत्याही पक्षाची असली तरी त्यांना विरोधकांच्या लोकशाही हक्कांचा त्रास होऊ लागतो. शिवाय, सर्व लोक आपल्यावर चाल करून येतील अशी भीती वाटू लागते. त्यातून ते पोलिसांचा सहारा घेतात. मग पोलिस बळाचा वापर करतात. झारखंडमध्येही हेच घडले असल्यास नवल नाही. तरीही झारखंड आणि दिल्लीच्या आंदोलनात कमालीचा फरक आहे. हे मुद्दाम सांगण्याची गरज यासाठी आहे की, दिल्ली आंदोलनाच्या वेळी मान फिरवून आणि डोळे बंद करून बसलेल्या भाजपवाल्यांना आणि त्यांच्या भाडोत्री मिडियाला आता एकदम जाग आली आहे. झारखंडमधील विद्यार्थ्यांवर कसा प्रचंड अन्याय होत आहे व लाठीमार करणे कसे गैर आहे हे तत्वज्ञान ते सांगू लागले आहेत. भाजपच्या झारखंड शाखेने तर राज्यामध्ये आणीबाणीसारखी भयानक दडपशाहीची स्थिती निर्माण झाल्याचे म्हटले आहे. दिल्लीमध्ये शांतपणे रस्त्यावरून चालणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार केला गेला. साध्या वेशातल्या अज्ञात लोकांनी बेछूट लाठ्या चालवल्या. पेलेट गन म्हणजे छऱ्यांची बंदुक चालवली गेली. त्यात दहा जण जखमी झाले. एकाचा डोळा गेला. याबाबत आजतागायत भाजपवाले तोंड उचकटायला तयार नाहीत. यांचे बॉस अमित शहा गायब आहेत. लोकसभेत तोंड दाखवायला घाबरत आहेत. दिल्लीत आंदोलकांवर वरवंटा फिरवायचा, त्याविषयी मिडिया गप्प राहील अशी तजवीज करायची आणि झारखंडमध्ये काही घडले की त्याविषयी आणीबाणी म्हणून बोंब मारायला सुरुवात करायची हा केवळ भाजपला शोभेल असाच ढोंगीपणा आणि मतलबीपणा आहे.

## सोरेन यांनी संवाद केला

झारखंडमधील विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या मागण्या या दिल्लीप्रमाणेच मुख्यतः परीक्षांशी संबंधित आहेत. झारखंड लोकसेवा आयोगाच्या १०३ क्लास वन पदांसाठी एप्रिलमध्ये पूर्वपरीक्षा झाली. तिला लाखो युवक बसले होते. जुलैच्या पहिल्या आठवड्यात तिचा निकाल आला तेव्हा २२०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे व अंतिम परीक्षेला पात्र ठरल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र हे करताना विविध पदांसाठींचे वेगवेगळे कटऑफ गुण दर्शवण्यात आले नाहीत. शिवाय निकाल जाहीर करताना त्यावर लोकसेवा आयोगाच्या सर्व सदस्यांच्या सह्या नव्हत्या. यामुळे तरुणांना शंका आली. त्यातच परीक्षेत यशस्वी म्हणून जाहीर केलेल्या विद्यार्थ्यांच्या कथित उत्तरपत्रिका सोशल मिडियात प्रसृत झाल्या. त्यामध्ये केवळ ४८ प्रश्न सोडवलेले दिसत होते. त्याच्या आधारे कटऑफइतके गुण मिळणे शक्य नव्हते. आता ही उत्तरपत्रिका खरी की खोटी हे कळलेले नाही. आजच्या काळात काहीही बनावट गोष्टी एआयच्या मदतीने खऱ्या म्हणून खपवता येतात. पण युवकांमध्ये त्यावरूनच ठिणगी पडली आणि ही परीक्षा रद्द करण्याची मागणी सुरु झाली. जंतरमंतरच्या यशामुळे मग तसेच धरणे आंदोलन व उपोषण सुरु झाले. यांचे नेते महातो हे गेले पंधरा दिवस उपोषणावर आहेत. कालच्या मोर्चातही रुग्णवाहिकेमधून ते सहभागी झाले होते. ती उत्तरपत्रिका खरी असो की नसो, या तरुणांचा संताप नक्की खरा आहे. त्याचा स्फोट झाला आहे हेही अमान्य करण्याचे कारण नाही. अशा वेळी कोणतीही सरकारे एकदम आंदोलकांपुढे झुकलो असे दाखवत नाहीत. झारखंड सरकारही त्याला अपवाद ठरले नाही. पण दिल्ली आणि रांचीच्या आंदोलनातला महत्वाचा फरक हा की, मोदी सरकारने जंतरमंतरवरचे आंदोलन दडपून टाकण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न केले. मुलांचे पाणी तोडण्यात आले. स्विगी वगैरेवरून येणारे खाण्याचे पुडके पोलिस लंपास करू लागले. टॉयलेट्सना कुलुपे घातली गेली. मेट्रो स्टेशन बंद करण्यात आली. या प्रकारची नाकेबंदी रांचीमध्ये झाली नाही. दुसरे म्हणजे मोदी सरकारने सीजेपीशी चर्चा कोणतीही चर्चा केली नाही. उलट झारखंडमधील हेमंत सोरेन यांच्या सरकारने आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी चार सदस्यांची समिती स्थापन केली.

## भाजपचा आटापिटा

सरकारने आंदोलनाच्या नेत्यांशी नियमित संवाद केला. त्यातूनच आंदोलकांच्या अनेक मागण्या हळूहळू मान्य होत गेल्या. एप्रिलमधील पूर्वपरीक्षा रद्द व्हावी ही मागणी सरकारने स्वीकारली. तिच्या नव्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील असे ठरले. झारखंड लोकसेवा आयोगाच्या तीनसदस्यांनी राजीनामे दिले. तीन जणांना अटक झाली. कालच्या मोर्चाच्या दरम्यान या आयोगाचे माजी अध्यक्ष खियांग्ते यांना अटक करण्यात आली. यापूर्वी अन्य दोन माजी सदस्यांना परीक्षांमधील गैरव्यवहार प्रकरणी अटक झालेली आहेच. त्यामुळे मोदी सरकारच्या तुलनेत सोरेन सरकारने आंदोलनाबाबत कितीतरी अधिक संवेदनशीलता दाखवली हे स्पष्ट दिसते. कालच्या मोर्चातही पोलिसांनी बराच संयम दाखवला. आंदोलक विधानभवनाच्या अगदी जवळ पोचले व संध्याकाळी चार ते सहा असे दोन तास त्यांनी तिथे ठिय्या दिला. त्यावेळचे व्हिडिओही उपलब्ध आहेत. यावेळी आंदोलकांनी कोणताही हिंसक प्रकार न केल्याने पोलिसही शांतपणे त्यांच्या समोर उभे आहेत. त्यांना तेथून घालवण्यासाठी विनाकारण कोणताही लाठीप्रयोग केला गेला नाहीहेही दिसते. संसदेवरील मोर्चाच्या वेळी मात्र आंदोलकांना पाकिस्तानी सैनिक असल्याप्रमाणे वागणूक दिली गेली व नंतरही मिडियातून त्यांच्यावर वाटेल ते आरोप केले गेले. झारखंडच नव्हे तर सर्वच राज्यांमधील परीक्षांबाबत आता शंका निर्माण झाल्या आहेत. त्यांचे पेपर फुटतात, निकाल वेळेवर लागत नाहीत व लागले तरी त्यामध्ये काळेबेरे असल्याच्या शंका कायम राहतात. पदे काही हजार आणि इच्छुक लाखो अशी स्थिती सर्वत्र आहे. पारदर्शकता आणणे आणि लाचखोरी व भ्रष्टाचाराला वाव मिळू नये अशी व्यवस्था करणे हे राज्यकर्त्यांचे काम आहे. पण नीट असो की झारखंड लोकसेवा आयोगाची परीक्षा, दोन्ही घेण्यासाठी ज्या संस्थांना जी खासगी कंत्राटे दिली गेली त्या कंपन्या संशयास्पद होत्या. त्यातूनच भ्रष्टाचार झाला असावा व लाखो रुपये लाच देऊन काही जणांनी चांगला निकाल आपल्या पदरात पाडून गेला असावा असे दिसते. मोदी सरकारने जंतरमंतरवरील आंदोलनानंतर नीट घेणाऱ्या संस्थेतल्या ४७ जणांना काढून टाकले. शिवाय मुख्य अधिकाऱ्यांची बदली केली. या प्रकरणी काही गुन्हेही दाखल आहेत. त्यावरून विद्यार्थ्यांच्या शंका खऱ्या होत्या हे स्पष्ट दिसते. झारखंडमध्येही काही अटका झाल्या आहेत. परीक्षा रद्द झाल्या आहेत. त्यावरून आंदोलकांचे म्हणणे खोटे नाही. आता आंदोलक सीबीआय चौकशीवर अडून आहेत. यामागे भाजपची फूस असल्याचे स्पष्ट दिसते. तरीही यातून दोन्ही बाजूंनी समन्वयाने काही तोडगा काढावा असेच कोणीही म्हणेल. झारखंडात आंदोलन पेटवून दिल्ली आंदोलनातील आपले अपयश झाकण्याचा भाजपचा आटापिटा चालू आहे. तो यशस्वी होऊ देता कामा नये.

---

**विचार**

# पोलिसांची बाजू कोण ऐकणार?

**कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चावर लाठीचार्ज करून पोलिसांनी विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केल्याचा आरोप केला जात आहे. माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता पोलिसांवर कारवाई केली जावी, अशी मागणी करण्यात येत आहे. पण कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांची बाजू कोण ऐकणार? त्यांना कोणत्या परिस्थितीमध्ये कर्तव्य निभवावे लागले?**



**प्रवीण दीक्षित**

दिल्लीमध्ये जंतर मंतर येथे झालेले आंदोलन आणि त्यानंतर संसदेवर काढण्यात आलेला मोर्चा यात पोलिसांनी विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला आणि बेदम मारहाण केली, असा आरोप करून खापर फोडले जात आहे. मात्र या प्रकरणात पोलिसांची बाजू कोणीच ऐकून घेताना दिसत नाही. वस्तुत: या आंदोलनात पोलिसांनी अत्यंत संयमाची भूमिका ठेवली. कुठेही शांततापूर्ण आंदोलन सुरू असेल तर ते होऊ देणे हे पोलिसांचे कर्तव्य असते. पण त्या आंदोलनाचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना व्हायला नको. आंदोलनाच्या नावाखाली रस्ता आडवणेही कायद्याला अपेक्षित नाही. शिवाय आंदोलन करणारा जमाव हिंसक होत असेल आणि सरकारी तसेच खासगी मालमत्तेचे नुकसान करत असेल, जाळपोळ करत असेल तर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक बळाचा वापर करण्याचा अधिकारही कायद्याने पोलिसांना दिला आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) नेत्यांना दिल्ली पोलिसांनी विनाविलंब जंतरमंतरवर शांततापूर्ण आंदोलन करण्याची परवानगी दिली. शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार कायद्याने सर्वच नागरिकांना दिला आहे. या प्रकरणात सीजेपीला आंदोलन करण्यासाठी तातडीने परवानगी देण्यात आली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली. ती म्हणजे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत, शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत.

दरम्यान, पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहेत. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'नीट' परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पुन्हा परिक्षा घेण्यात आली. २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. त्यापैकी दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला. या विद्यार्थ्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा. सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. पण असे काही न करता त्यांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम '१६३ ब' म्हणजे पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या '१४४' नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलिस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही.

२० जुलै रोजी जंतरमंतरवर देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरूवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आली नव्हती, तर त्यांना कोणी तरी आणले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वत:चे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते. मोर्चा निघताना आपण पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत, असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहित आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी 'बॅरिकेड्स'च्या अलिकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, असा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र 'बॅरिकेड्स' उधळून लावत संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा लोकांना अडवण्याची जबाबदारी पोलिसांवर असते. हे मोर्चेकरी शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर जोरदार दगडफेक सुरू केली. अनेक युवकांनी बंदोबस्तसाठी तैनात असलेल्या पोलिसांवर हल्ले करुन बेदम मारहाण केली. पोलिस शिपायापासून विशेष पोलिस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान ७२ अधिकृत व्हिडिओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर, महिला पोलिसांवर, पत्रकारांवरही हल्ला केला.

हे कमी की काय म्हणून तिथे उभ्या असलेल्या पोलिसांच्या आणि खासगी वाहनांचीही तोडफोड करण्यात आली. त्यांनी गरीब रिक्षावाल्यांनाही सोडले नाही. हे सगळे होत असताना अभिजीत दिपकेसहित सीजेपीचे नेते युवकांना मारहाणीसाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसत होते. हे हल्ले घडून गेल्यानंतर स्वत:ची जबाबदारी काय, याची कल्पना नसलेले लोक पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. मोर्चामध्ये आंदोलक जाळपोळ करत असतील, कोणाला मारहाण करत असतील, सरकारी आणि खासगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर पोलिसांनी ते शांतपणे पाहत राहणे अपेक्षित नाही. त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आलेले असते. हिंसक मार्ग अवलंबणाऱ्या आंदोलकांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना कायद्याने देण्यात आले आहेत. या जमावाला पोलिसांनी प्रथम शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर त्यांना चेतावणी देण्यात आली आणि त्यानंतर कमरेच्या खाली सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. तरी जमाव नियंत्रणात येत नाही म्हटल्यावर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. नळकांड्या फुटल्यावर त्याचे धातूचे काही तुकडे जमावातल्या काहींना लागू शकतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मोर्चासाठी तैनात असलेल्या पोलिसांपैकी १५० हून अधिक पोलिस अधिकारी जखमी झाले. ते सगळे रुग्णालयात दाखल आहेत. म्हणजे ते काही हल्ला झाल्याचे खोटे सांगत नाहीत. याउलट जमावापैकी कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये एका मुलीचा मृत्यू झाल्याची आवई उठवली गेली, तीही खोटी ठरली. या सगळ्या घटनाक्रमाचे चित्रण सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर केला म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे योग्य नाही. आंदोलकांची संसदेमध्ये चर्चा करायची तयारी नाही. संसद ठरावीक नियमांप्रमाणे चालते. तिथे मुद्द्यांवर चर्चा केली जाते, प्रक्रियेला वेळ लागतो, पण आंदोलकांना सगळे आत्ताच्या आत्ता हवे आहे. योगेंद्र यादव नावाचे महाशय स्वत:ला पत्रकार किंवा नेता म्हणवतात. ते म्हणतात, आता निर्णय संसदेत नाही, तर रस्त्यावर होतील. म्हणजे झुंडशाहीचेच राजकारण चालणार का? झुंडशाहीला हे तथाकथित नेतेच प्रोत्साहन देत आहेत. आज दिल्लीमध्ये दंगल झाली, उद्या कर्नाटक, केरळ किंवा इतर बिगर भाजपाशासित राज्यांमध्येही होऊ शकेल. सगळीकडे आपल्याला दंगलीच करायच्या आहेत का, हा मुद्दा आहे.

सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे, की रस्ता ही निदर्शने करण्याची जागा नाही. रस्त्यावर वृद्ध लोक असतात, रुग्णवाहिका येत-जात असतात, सामान्य नागरिक कामासाठी बाहेर पडलेले असतात. रस्त्याचा वापर करण्याचा पहिला हक्क त्यांचा आहे. प्रत्येक ठिकाणी काही मैदाने आहेत. अशा ठिकाणी परवानगी घेऊन शांततेच्या मार्गाने आंदोलने केल्यास ही समस्याच उद्भवणार नाही. झुंडशाहीला राजकीय पक्षांनी प्रोत्साहन द्यायचे की नाही, हे त्यांनी ठरवावे. या झुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वसामान्यांच्या संमतीनेच शासनाने पोलिसांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही उठून पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करू नये.

---

**चर्चा आजची**

# पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड



**वैभव पाटील**

शेती ही नेहमीच मानवी संस्कृतीची आधारस्तंभ राहिली आहे, जी अन्न, आर्थिक स्थैर्य आणि ग्रामीण रोजगार उपलब्ध करून देते. परंतु, वाढत्या जागतिक लोकसंख्येमुळे शेतीवर उत्पादकता, कार्यक्षमता याबाबतचे दडपण वाढले आहे. आधुनिक शेती, तंत्रज्ञानातील प्रगती, वैज्ञानिक संशोधन, आणि नवीन पद्धती यांद्वारे विकसित होत आहे, जे या आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करीत आहे. भाताचे कोठार अशी ख्याती असलेल्या रायगड जिल्ह्यातील बळीराजा आता आधुनिक शेती करण्यावर विशेष भर देऊ लागला असून, भातशेतीतील मजूरांची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. यावर मात करण्यासाठी यांत्रिकी पद्धतीने भात लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. येत्या कालावधीत यामध्ये वाढ करण्याचा संकल्प कृषी विभागाने केला असून त्यासाठी कृषी यांत्रिकीकरण योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

पारंपारिक पद्धतीने भात लागवड करण्यासाठी मजूरांचा अभाव, वाढलेले मजुरीचे दर, खत व बियाण्याचा खर्च, लागवडीसाठी लागणारा वेळ व त्या तुलनेत कमी प्रमाणात मिळणारे उत्पन्नामुळे अनेक शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने भात लागवड न करता यांत्रिक पद्धतीने भात लागवड करण्यास पसंती दिली आहे. यांत्रिक पद्धतीने भात लागवड करण्यासाठी पारंपारिक पद्धतीपेक्षा अत्यंत कमी खर्च येतो. तसेच, वेळ व बियाण्याची बचत होते. त्याचबरोबर कमी दिवसांच्या रोपांची लागवड करण्यात येत असल्याने रोपे चांगल्या प्रकारे रुजून फुटव्यांची संख्या वाढते. परिणामी यांत्रिक पद्धतीने भात लागवड करण्यात आल्यानंतर मिळणाऱ्या उत्पन्नातही दुपटीपेक्षा जास्त वाढ होत आहे. बदलत्या काळानुसार शेतीचे स्वरूप झपाट्याने बदलत असून, शेतकरी आता पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत यांत्रिकी शेतीकडे वेगाने वाटचाल करत आहेत. मजुरांची टंचाई, वाढता उत्पादन खर्च आणि वेळेचे नियोजन या आव्हानांवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, पॉवर टिलर, रोटाव्हेटर, भातलावणी यंत्र, इतर आधुनिक कृषी अवजारांचा वापर वाढविला आहे. त्यामुळे शेतीची कामे कमी वेळेत, कमी खर्चात आणि अधिक कार्यक्षमतेने होत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक बचतीचा मार्गही मोकळा होत आहे.

ग्रामीण भागातून रोजगारासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर आणि उपलब्ध मजुरांची कमतरता यामुळे शेतकऱ्यांसमोर शेतीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत यांत्रिकी शेती हा प्रभावी पर्याय ठरत आहे. विशेषतः भातलावणी, नांगरणी, मशागत, फवारणी आणि कापणी यांसारखी कामे आता आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने जलद गतीने पूर्ण केली जातील, असे सांगण्यात आले. यामुळे मजुरीवरील खर्चात लक्षणीय बचत होत असून, कमी वेळेत अधिक क्षेत्रावरील शेतीची कामे पूर्ण करणे शक्य होत आहे. परिणामी उत्पादनक्षमता वाढण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होत आहे.

यंत्राद्वारे लागवड करण्यासाठी प्रथमतः रोपवाटिका तयार करण्यासाठी शेतातील माती चाळून घ्यावी लागते. एक हेक्टर क्षेत्राच्या रोपवाटिकेसाठी लागणारी माती चाळण्याचे काम एक मजूर एक दिवसात करतो. ही रोपवाटिका १८ ते २१ दिवसांत तयार होते. पावसाचा खंड जरी पडला तरी कमी पाण्यावर रोपवाटिका तयार करू शकतो. एका दिवसात ४ रांगांच्या यंत्राद्वारे २ ते ३ हेक्टर क्षेत्रावर लावणी होवू शकते. त्यासाठी एकरी १ ते १.५ लिटर पेट्रोल लागते. भात लावणी यंत्र एका हंगामात ४० हेक्टर पर्यंत लावणीचे काम करु शकते. यासाठी ५ हजार रुपये पर्यंत देखभाल व दुरुस्ती खर्च येतो.

आज शेती टिकवायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार अपरिहार्य आहे. मजुरांची कमतरता दिवसेंदिवस वाढत असल्याने यंत्राद्वारे शेती करणे ही काळाची गरज बनली आहे. यांत्रिकीकरण व पारंपारिक पद्धतीने भात लागवड केल्यास कसा फरक पडतो व यंत्राद्वारे लागवड केल्यामुळे भातशेती कशी फायद्याची आहे, याचे प्रशिक्षण व मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले गेले. त्यामुळे या पद्धतीने लागवडीसाठी शेतकरी तयार झाले. यांत्रिकीकरण पद्धतीत मजूर कमी लागतात व रोपवाटिकेचा खर्च सुद्धा कमी होतो आहे. भात शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभागामार्फत विविध प्रात्यक्षिकांचे आयोजन जिल्ह्यामध्ये करण्यात आले असून, यामध्ये चारसूत्री पद्धतीने भात लागवड, एसआरती पद्धतीने भात लागवड, ड्रम सीडरद्वारे भात लागवड व यांत्रिक पद्धतीने भात लागवड यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांचा कल यंत्राद्वारे भातशेतीकडे वाढविण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी गटांच्या माध्यमातून यंत्राद्वारे यशस्वीरित्या भात लावणी करण्यात आली आहे.

---

**लोकसंसद**

## भक्ती आणि शुद्धतेचा सण, तेजोमय दीप अमावस्या!

पावसाळा मध्यावर येऊन स्थिरावतो त्यावेळी निसर्गात आणि वातावरणात एक प्रकारचा कुंदपणा आलेला असतो. अशा वातावरणात मनात एक प्रकारची मरगळ आलेली असतानाच आषाढ महिन्याचा शेवटचा दिवस उजाडतो. दीप अमावस्या! म्हणजेच दिव्यांचा सण. मरगळलेल्या मनाला ऊर्जा आणि उत्साह देणारा सण. खरे तर अमावस्या अनेकदा अशुभ किंवा नकारात्मक मानली जाते. परंतु आषाढ अमावस्येच्या दिवशी आपल्या पूर्वजांनी दिव्यांची पूजा करण्याची प्रथा सुरू केल्यामुळे आषाढ अमावस्या आपल्या संस्कृतीतील एक अत्यंत सुंदर आणि सकारात्मक सण झाला आहे. या दिवशी घरातील सर्व समया, निरांजने आणि दिवे स्वच्छ घासून पुसून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. दिवा हा केवळ प्रकाशाचे साधन नाही, तर तो ज्ञान, मांगल्य आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहे. दिव्यांच्या प्रकाशाने अंध:कार, नकारात्मक ऊर्जा आणि अशुभ शक्तींचा नाश होऊन संपूर्ण घरात सकारात्मक आणि प्रसन्नतेचे वातावरण तयार होते. परिश्रम, भक्ती आणि शुद्धतेचा सण असलेल्या दीप अमावस्येनंतर पवित्र श्रावण महिन्याला प्रारंभ होत असल्यामुळे या दिवसाचा आनंद द्विगुणित होतो. पंचांगानुसार या वर्षी दीप अमावस्या मंगळवार ११ ऑगस्ट रोजी रात्री १ वाजून ५३ मिनिटांनी सुरू होणार असून १२ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजून ६ मिनिटापर्यंत अमावस्येची समाप्ती होणार आहे. ऊर्जा, उत्साह आणि हर्ष, उल्हास मनोमनी जागवणाऱ्या तेजोमय दीप अमावस्येच्या सर्वांना शुभेच्छा!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

**दिनविशेष**

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे. याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते.

विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वीनंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी. व्ही. रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४५ साली ते ब्रिटनला गेले. तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले. कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते. भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती.

भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले. म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले. पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशोधकांची एक टीम बनवली. त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे, यासाठी दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे, यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व यांचा मोलाचा वाटा आहे. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, पुणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१२ ऑगस्ट

१) श्री.गणेश रामचंद्र पाटील
श्रीबाग-२, अलिबाग, १२-८-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**मिहिर राजेंद्र जाधव, वाढदिवस, चेंढरे, अलिबाग**

# नागरी समस्या महिनाभरात सोडवा

- **अन्यथा बेमुदत उपोषण करणार**
- **प्रहार संघटनेचा पालिकेला इशारा**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध नागरी समस्यांबाबत प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात न आल्यास महिनाभरानंतर पनवेल महानगरपालिकेविरोधात बेमुदत उपोषण करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पनवेल शहरातील रस्त्यांवरील खड्डे तत्काळ बुजवून संबंधित ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करावी, पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य तातडीने उपलब्ध करून द्यावे. तसेच आदिवासी वाड्या-पाड्यांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

खारघरमधील धामोळे येथे आदिवासी नागरिकांसाठी तात्काळ स्मशानभूमी उभारण्याची मागणीही या निवेदनातून करण्यात आली आहे.

लोकसहभाग वाढविण्यासाठी प्रभाग क्षेत्र सभा तातडीने सुरू कराव्यात. अतिरिक्त अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकांवर कायदेशीर कारवाई करावी, शहरातील अनधिकृत मोबाइल टॉवर हटवावेत आणि थकीत सुमारे २०० कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल करावा, अशी मागणी प्रहार संघटनेने केली आहे.

तसेच, शासनाच्या नियमानुसार दर तीन वर्षांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात, अनधिकृत व बेकायदेशीर फेरीवाल्यांवर कारवाई करावी. तसेच अधिकारी जितेंद्र मढवी यांचे निलंबन करावे, अशी मागणीही निवेदनात प्रहार संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

पालिकेकडून रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असतात. मात्र असे असतानाही नागरिकांना दरवर्षी खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत ठेकेदारांवर कठोर कारवाई होत नसून उलट त्यांना अभय मिळत असल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे.

ॲड. मनोज टेकाडे, ॲड. अजय तापकीर, अजय कदम, अभिनव येलवे, राहुल तेलंग, पंकज मोहिते आदी पदाधिकारी यांच्या उपस्थित हे निवेदन पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे देण्यात आले.



### आंदोलनाला पाठिंबा देण्याचे आवाहन

पालिकेने महिनाभरात मागण्यांवर ठोस कारवाई न केल्यास बेमुदत उपोषण करण्यात येईल. नागरी प्रश्नांसाठी नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन प्रहार संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी केले.

## खोपोलीत रंगला ‘म्याऊ’चा अनोखा उत्सव




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली येथे मांजर या लाडक्या प्राण्यांवरील प्रेमाचा अनोखा उत्सव रंगला. आंतरराष्ट्रीय मांजर दिनानिमित्त दि.८ ऑगस्ट रोजी श्री कृपा एक्वेरियम व पेट केअर सेंटर येथे हेल्प फाउंडेशनच्या सहकार्याने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहर व परिसरातील २०० हून अधिक मांजरप्रेमींनी आपल्या लाडक्या मांजरांसह या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमात मांजरांचे आरोग्य, योग्य आहार, स्वच्छता आणि संगोपन याबाबत पशुवैद्यकीय तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. विष्णू काळे आणि डॉ. सरदार यांनी मांजरांच्या आरोग्याशी संबंधित विविध विषयांवर माहिती देत उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

पाळीव मांजरांसाठी आवश्यक खाद्यपदार्थ, सप्लिमेंट्स, औषधे आणि देखभाल साहित्याची माहिती मिळावी यासाठी विविध कंपन्यांचे स्टॉल व उत्पादनांचे वितरणही करण्यात आले. ड्रूल्स फूड, सिग्नेचर, झूमिस पेट्स, अवंती फूड, ऑरेंज पेट फूड, जेनेक्स, सावा वेट आदी कंपन्यांच्या माध्यमातून फूड सॅम्पल्स, सप्लिमेंट्स, पशुखाद्य, औषधे, शाम्पू आणि विविध भेटवस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या.

## वृक्षारोपणासह शैक्षणिक साहित्य भेट



**। महाड । प्रतिनिधी ।**

सापे येथील झुंजार मित्र मंडळ (रजि.)च्या वतीने सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय जाणीवेतून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य भेट व वृक्षारोपण सोहळा उत्साहात पार पडला. एकत्र युवा-बदल नवा हे ध्येय समोर ठेवून गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या या मंडळाने या उपक्रमातून उत्तम समाजकार्याचा आदर्श घालून दिला आहे.

या उपक्रमात शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या, पेन सेट आणि खाऊची भेट देण्यात आली. भूमी समर्पण फाउंडेशन आणि भूषण सुतार यांचे विशेष सहकार्य लाभलेल्या या उपक्रमादरम्यान परिसरात आंबा, काजू, फणस व जांभूळ आदी विविध छायादार व फळझाडांच्या रोपांचे रोपण करण्यात आले.

## चांगुणाबाई पाटील यांचे निधन



**सुतारवाडी :** चांगुणाबाई गजानन पाटील (पेझारी) यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या स्वर्गीय सुलभा काकू प्रभाकर पाटील यांच्या घरी काही वर्ष कामाला होत्या. काही काळ त्यांनी घरोघरी जाऊन भाजीचा व्यवसाय केला. त्यांना परमार्थाचीदेखील आवड होती. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, जावई, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. त्यांचे दहावे दि.१९ ऑगस्ट रोजी व उत्तरकार्य दि.२२ ऑगस्ट रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याची माहित त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली.

## वाघोशीत रंगला भात लावणीचा वर्ग

**पाली :** शेतकरी हा जगाचा पोशिंदा असल्याने विद्यार्थ्यांना शेतीच्या कामांबद्दल प्रत्यक्ष अनुभव मिळणे फार महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने क्षेत्रभेटी अंतर्गत राजिप आदर्श शाळा वाघोशी येथील विद्यार्थ्यांनी शेतात उतरून भात लावणीचा मनसोक्त आनंद घेतला. मुख्याध्यापक राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वाघोशीमधील शेतकरी बबन देशमुख यांच्या शेतावर भेट दिली. निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी विद्यार्थ्यांना प्रथम भाताची रोपे लावणीसाठी वाफ्यावरून अलग कशी करावीत व त्याचे मूठ कसे बांधावे, याबद्दल प्रात्यक्षिक करून दाखवले.

## युवा महोत्सवात पालीवाला महाविद्यालयाचा डंका



**। पाली । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन दक्षिण रायगड विभागीय युवा महोत्सव २०२६-२७ चा सोहळा पीएनपी महाविद्यालय, वेश्वी येथे नुकताच पार पडला. या महोत्सवात पालीतील सुएसोच्या शेठ ज.नौ. पालीवाला वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा अष्टपैलू आविष्कार घडवत घवघवीत यश संपादन केले आहे.

या विभागीय युवा महोत्सवात पालीवाला महाविद्यालयाने एकूण ९ विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट अभिनयाने व वक्तृत्वाने परीक्षकांची तसेच उपस्थितांची मने जिंकून तब्बल ६ स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले. या दैदिप्यमान कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. पालीवाला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ‘‘साटलं‘‘ ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेत मीराची भूमिका साकारणारा टी.वाय.बी.कॉम.चा विद्यार्थी करण कदम आणि सुंदरीची भूमिका साकारणारी विद्यार्थिनी वेदिका घासे यांच्या जिवंत व बहारदार अभिनयाचे उपस्थितांसह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष कौतुक केले.

### पटकावलेली पारितोषिके

केतन गुप्ता (एम.एससी. भाग-२)- तृतीय क्रमांक वक्तृत्व स्पर्धा (हिंदी), केतन गुप्ता (एम.एससी. भाग २) तृतीय क्रमांक कथाकथन (हिंदी), केतन गुप्ता (एम.एससी. भाग-२)- उत्तेजनार्थ - मराठी प्रहसन (नाटक)- द्वितीय क्रमांक हिंदी प्रहसन (नाटक)- तृतीय क्रमांक एकपात्री अभिनय- प्रसाद नंदिनी रमेश (प्रथम वर्ष वाणिज्य)- द्वितीय क्रमांक वक्तृत्व स्पर्धा (मराठी) विशेष म्हणजे, केतन गुप्ता या विद्यार्थ्याने एकट्याने तीन वेगवेगळ्या प्रकारांत पारितोषिके पटकावून आपल्या अष्टपैलू कौशल्याची छाप पाडली.

## विद्यार्थ्यांना हेल्थ किटचे वाटप

- **चिवे आश्रमशाळेत आरोग्य तपासणी**
- **दि लाईफ फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम**



**। पाली । प्रतिनिधी ।**

दि लाईफ फाउंडेशनच्या वतीने आश्रमशाळा चिवे येथे भव्य आरोग्य तपासणी शिबीर व हेल्थ किट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २८५ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी, तर १२१ किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दि लाईफ फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी संस्थेच्या सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या हेल्थ किटमधील साहित्याचा योग्य वापर कसा करावा, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व, चांगल्या आरोग्याच्या सवयी आणि नियमित आरोग्य तपासणीचे फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरादरम्यान केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर शाळेतील बारा शिक्षक व कर्मचाऱ्यांची देखील हिमोग्लोबिन, रक्तगट, रक्तदाब आणि रक्तातील साखरेची (शुगर) मोफत तपासणी करण्यात आली. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि निरोगी जीवनशैलीच्या सवयी विकसित व्हाव्यात, या उद्देशाने हे शिबीर राबविण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जनजागृती व्हावी, यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात आला.

## नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**माणगाव :** शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर बुधवार दि.१२ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत होणार असून जुने एसटी स्टँड माणगावजवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे.



## ‘फायनान्शियल लिटरसी’ मार्गदर्शन

**महाड :** लोकविकास सामाजिक संस्थेच्या एम.एम. जगताप महाविद्यालय, महाड येथे वाणिज्य विभाग आणि करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१०) ‘फायनान्शियल लिटरसी स्मार्ट निवेशक जागरूकता’ या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या व सेबी स्मार्ट ट्रेनर मिली पॉल यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे महत्त्व समजावून सांगितले. बचत, बजेट नियोजन, गुंतवणूक, विमा तसेच डिजिटल आर्थिक व्यवहार याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आर्थिक व्यवहार करताना आवश्यक असलेली दक्षता, योग्य गुंतवणुकीचे नियोजन, आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि भविष्यातील आर्थिक गरजांचा विचार करून निर्णय घेण्याचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

**१५ ऑगस्टला मुंबईत विशेष कार्यक्रम** | **सांस्कृतिक कार्य विभागाचा पुढाकार**

# ‘वंदे मातरम्’मधून देशभक्तीचा जागर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त वंदे मातरम् या देशभक्तीपर गीत व नृत्यावर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता श्रीमती भुरीबेन लक्ष्मीचंद गोलवाला सभागृह, कामा लेन, घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व नागरिकांना विनामूल्य प्रवेश असणार आहे.



भारताचा स्वातंत्र्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमान, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा दिवस आहे. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, शौर्य आणि बलिदानाची कृतज्ञतेने आठवण करून देत राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून दिला जाणार आहे.

या कार्यक्रमात भैरी भवानी परफॉर्मिंग आर्ट्स आणि एस.पी. एन. दोशी महाविद्यालय यांच्या कलाकारांकडून देशभक्तीपर गीत व नृत्यावर आधारित विशेष सांस्कृतिक सादरीकरण करण्यात येणार आहे. विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम, शौर्य, त्याग आणि भारतीयत्वाचा प्रेरणादायी संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, राष्ट्रनायकांचे योगदान आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे.

### देशभक्ती, कला आणि संस्कृतीचा सुरेख संगम

वंदे मातरम् या कार्यक्रमामध्ये देशभक्तीपर गीत, संगीत आणि नृत्याविष्कारांच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास, स्वातंत्र्यवीरांचे योगदान, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय संस्कृतीचे वैभव प्रभावीपणे सादर करण्यात येणार आहे. देशभक्ती, कला आणि संस्कृतीचा सुरेख संगम अनुभवण्याची संधी या कार्यक्रमातून रसिकांना लाभणार आहे.

> “मुंबई व परिसरातील नागरिक, विद्यार्थी, युवक आणि रसिकांनी या देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.
> - श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय”

# निवडक



## विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

**खोपोली :** विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल जबाबदारी आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्मेल कॉन्व्हेंट शाळेत दि.३ ते ७ ऑगस्ट या कालावधीत पाच दिवसीय सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या पुढाकारातून, खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल आणि खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शंकर धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना ‘डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदारीपूर्ण वापर’ या विषयावर प्रबोधन केले. या उपक्रमांतर्गत इयत्ता नववीतील ३० विद्यार्थ्यांच्या समितीने पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयावरील कृतीयुक्त गाणी, कविता, भाषण, गटचर्चा, पोस्टर, घोषवाक्य, व्यंगचित्र आणि अम्ब्रेला पेंटिंग यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच विविध वर्गांमध्ये दृकश्राव्य सादरीकरणाच्या माध्यमातून सायबर सुरक्षेविषयी माहिती देण्यात आली. सायबर जनजागृती उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.



## संत नामदेव महाराज समाधी सोहळा

**म्हसळा :** म्हसळा येथील शिंपी समाज मंदिरात श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांचा समाधी सोहळा विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांनी पार पडला. यावेळी परिसर ‘विठू नामाचा गजर’ आणि ‘संत नामदेव महाराजांचा जयघोष’ यांनी दुमदुमून गेला. समाधी सोहळ्यानिमित्त शिंपी समाज मंदिरात श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर समाज मंदिरापासून राधाकृष्ण मंदिरापर्यंत श्री नामदेव महाराजांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत समाज बांधव, महिला मंडळ तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भक्तिमय वातावरणात टाळ-मृदंगाच्या गजरात, भजन-कीर्तनाच्या साथीने पालखी मिरवणूक उत्साहात पार पडली. कार्यक्रमादरम्यान भजन व कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संत नामदेव महाराजांचे कार्य, त्यांची भक्ती, समाजप्रबोधन आणि समतेचा संदेश याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेल्या यशाचे कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



## विद्यार्थ्यांनी अनुभवली भात लागवड

**खांब :** पुस्तकातील शेतीचे धडे केवळ वर्गात न शिकता त्याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, या उद्देशाने रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थ्यांनी थेट शेतामध्ये जाऊन पावसाळी भात लागवडीचा आनंद लुटला. पावसाळ्याच्या हिरव्यागार वातावरणात शेतामध्ये सुरू असलेल्या भात लागवडीच्या कामात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेतकरी बांधवांनी विद्यार्थ्यांना भात लागवडीची पद्धत, रोपांची निवड, लागवडीचे अंतर तसेच शेतीतील विविध कामांची माहिती प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून कृषीनिष्ठ शेतकरी नामदेव देवकर यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. यावेळी शेतकरी बांधवांनी गायलेल्या पारंपरिक शेतकरी गीतांमध्ये विद्यार्थ्यांनीही सहभाग दर्शवून आनंद लुटला. चिखलात उतरून शेतकऱ्यांसोबत काम करण्याचा हा अनोखा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ‘शेती म्हणजे केवळ व्यवसाय नसून कष्ट, श्रम आणि निसर्गाशी असलेले नाते जपणारे जीवन’ याची जाणीव झाली. अन्नधान्य आपल्या ताटात येण्यासाठी शेतकरी किती मेहनत घेतो, याची प्रत्यक्ष अनुभूती विद्यार्थ्यांना मिळाली.



## संत नामदेव महाराज संजीवन सोहळा

**तळा :** श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज संस्था तळातर्फे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७६ वा संजीवन सोहळा श्री राधाकृष्ण मंदिर, शिंपी आळी येथे साजरा करण्यात आला. सोमवारी (दि.१०) सकाळी ५.३० वाजता काकड आरती त्यांनतर श्रीची पूजा पार पडली. यावेळी सर्व समाज बांधव भगिनी मोठ्या संखेने उपस्थित होते. दुपारी १२.३० वाजता भजन व आरती घेण्यात आली. दुपारी एक वाजता महाप्रसाद देण्यात आला. यावेळी जवळपास चारशे ते साडेचारशे भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. याचवेळी सालाबादप्रमाणे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. शासकीय रक्त पेढी आलिबाग येथील डॉ. दीपक गोसावी व त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ४७ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक स्तुत्य उपक्रमाला सहकार्य केले. सायकाळी शिंपी समाजातील गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा संस्थेच्या पदाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सायंकाळी महिला मंडळातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या स्पर्धकाना महिला मंडळ पदाधिकारी व पाहुण्याच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार निलेश पांढरकामे, श्रेयश रोडे व प्रणव मेकडे यांनी उत्तम प्रकारे केले.

# शाळकरी मुलींच्या व्हिडिओमुळे प्रशासन जागे

**|| खांडपे-कोंडिवडे रस्त्याची दुरुस्ती सुरु || सार्वजनिक बांधकाम विभागाला विचारला जाब**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील कोंदीवडे-खांडपे रस्त्यावरील खड्ड्यांच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी खांडपे येथील ज्ञान मकरंद विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शनिवारी (दि.८) ऑगस्ट रोजी छत्रीला माईक करून पत्रकारांच्या भूमिकेत विद्यार्थिनींनी रस्त्याची दुरवस्था मिश्कील शैलीत मांडली. हा व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रचंड व्हायरल होताच प्रशासन जागे झाले आहे.

ज्योत्स्ना घारे ही विद्यार्थिनी आपल्या गावाच्या रस्त्याची बाजू रिपोर्टर म्हणून मांडत होती तर कॅमेरामन म्हणून मानसी पवार हिने जबाबदारी पार पाडली होती. त्या मुलींचा व्हिडिओ व्हायरल





झाल्यानंतर व्हिडीओ बनवणाऱ्या शालेय मुली या प्रसिद्धीचे झोतात आल्या आहेत. मात्र, राज्य सरकारकडून या रस्त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला जाब विचारला गेला असल्याचे बोलले जात होते.

सोमवारी (दि.१०) ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्त्यावर पडलेले खड्डे कमी करण्यासाठी जेसीबी मशीन यांचा वापर करण्यात आला. ब्लेड मारून राहिलेले खड्डे खडी जेएसबी खडी टाकण्यात आली आणि रोलर फिरवून रस्ता सुस्थितीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

> चिंचवली-चांदइ-कडाव-तांबस-जांबिवली-दहिवली-कोंदिवडे असा राज्यमार्ग रस्ता असून या रस्त्याचे मजबुतीकरण करण्याचे काम मंजूर आहे. त्या ठिकाणचा रस्ता पावसाळ्यानंतर मजबूत केला जाईल.
> -राहुल देवांग, उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग

या रस्त्यावर मे महिन्यात खडी टाकून रस्ता दुरुस्त केला होता, पण पावसाळ्यात रस्त्यावरील खडी वाहून गेल्याने रस्ता खराब झाला होता.

पावसाळा संपल्यानंतर या मार्गाचे संपूर्ण डांबरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली. तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील अनेक रस्त्यांवर खड्डयांची समस्या कायम असून, नागरिकांकडून कायमस्वरूपी उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या रस्त्याचे मजबुतीकरण करण्याचे काम मंजूर आहे. त्या ठिकाणचा रस्ता पावसाळ्यानंतर मजबूत केला जाईल असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागांनी दिली आहे. आ. थोरवे यांनी रस्त्याची दुरुस्ती करून रस्त्याच्या कामासाठी तत्काळ निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे आश्वासन दिले आहे.

# हाळ फाटा-पळसदरीमार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

**| खोपोली | प्रतिनिधी |**




हाळ फाटा मार्गे पळसदरी-कर्जत या रस्ता क्रमांक ५४८/एची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना धोकादायक परिस्थितीतून मार्गक्रमण करावे लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून अपघातांच्या घटना घडत असून, दोन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

रस्त्यावरील खड्डे, अपूर्ण काम आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. या अपघातांत काहींना जीव गमवला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. त्यामुळे रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

रस्त्याचे काम सुरू असताना वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सूचना फलक, प्रतिबंधक व्यवस्था आणि इतर सुरक्षात्मक उपाययोजना करणे अपेक्षित असताना त्याचा अभाव असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्याची पाहणी करून अपूर्ण काम पूर्ण करून अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक सुरक्षाव्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

> अपूर्ण कामामुळे या रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत. अनेक जण मृत्यूमुखी पडले असून अनेक जण जखमी झाले आहेत. प्रशासनाने नागरिकांच्या जीविताचा प्रश्न गांभीर्याने घेऊन रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे आणि आवश्यक सुरक्षाव्यवस्था करावी.
> - किरण हडप, माजी ग्रामपंचायत सदस्य

# विद्यार्थ्यांनी घेतला भात लावण्याचा अनुभव



**| खरोशी | प्रतिनिधी |**

राजिप शाळा बोरी तालुका पेण या शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत क्षेत्रभेट देऊन शेताच्या बांधावर जाऊन शेतातील रोपांची लावणी करण्यात आली. या उपक्रमात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांच्यासह सदर उपक्रम यशस्वी करण्यात आला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप पाटील, प्रिया म्हात्रे, मनोज थळे, आदिनाथ पाटील पांडुरंग म्हात्रे, उज्वल म्हात्रे, अमोल म्हात्रे, प्रमिला म्हात्रे, देविदास पाटील, कृष्णा दिवेकर, मनीषा कोठावले, जोत्स्ना म्हात्रे, जोत्स्ना पाटील यासह गावातील ग्रामस्थ मंडळ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक राखी सैनिकांसाठी उपक्रमातून
# जवानांना प्रेमाची ओवाळणी

**| रोहा | प्रतिनिधी |**

देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सालाबाद प्रमाणे यंदाही सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने एक राखी सैनिकांसाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत नागरिकांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्या आणि संदेशपत्रे संकलन करून नंतर भारतीय सीमेवरील जवानांसाठी पाठविण्यात येणार आहेत. सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने मागील १० वर्षापासून हा उपक्रम राबविला जात आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी अनेक जवानांना आपल्या बहिणींकडून राखी बांधून घेण्यासाठी घरी जाता येत नाही. त्यामुळे देशाचे रक्षण करणाऱ्या या जवानांप्रती आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

१२ ऑगस्ट २०२६ पर्यंत रायकर पार्क येथील सुहास अपार्टमेंट शीतल चायनिज सेंटर समोरील कार्यालयात जमा करावे असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ९२७०७१७०३० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रिलायन्स फाऊंडेशनची सामाजिक बांधिलकी

**आदिवासी नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून ग्रामीण व आदिवासी समुदायाच्या आरोग्य संवर्धनासाठी रिलायन्स फाउंडेशन, नागोठाणे सीएसआर विभागाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्था, रोहा यांच्या विनंतीला प्रतिसाद देत लायन हेल्थ फाऊंडेशन, अलिबाग यांच्या सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले.

नागोठाणे येथील श्री शिव गणेश उत्सव मंडळाच्या सभागृहात झालेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने आदिवासी नागरिकांची आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात आली. नागरिकांना नेत्र आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यासोबतच डोळ्यांशी संबंधित संभाव्य समस्यांचे प्राथमिक स्तरावर परीक्षण करण्यात आले.

या उपक्रमातून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या रिलायन्स फाउंडेशनच्या प्रयत्नांना बळ मिळाले. आरोग्य, शिक्षण, उपजीविका, महिला सक्षमीकरण आणि समुदाय विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या फाउंडेशनच्या समुदाय-केंद्रित उपक्रमांमध्ये या शिबिराची महत्त्वपूर्ण भर पडली.

शिबिराच्या आयोजनासाठी आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्था, लायन हेल्थ फाऊंडेशन, स्वयंसेवक तसेच स्थानिक नागरिकांचे सहकार्य लाभले.

# ॲड. ओम जोशीचा सत्कार

**आगरदांडा :** नवनिर्वाचित ॲड. ओम जोशी यांचा उद्धवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, मुग्धा जोशी, राजन जोशी, बाळकृष्ण गोंजी, रूपेश जामकर, अशोक विरुकुड, चंद्रकांत अपराध, मोहन पाटील, प्रशांत कासेकर, विजय वाणी, रुपेश पाटील, श्रध्दा अपराध, देवायानी गुरव, प्रकाश दांडेकर, सुहासिनी सुभेदार, प्रज्ञा उमरोटकर, उत्कृष्ट धोत्रे आदिंसह उद्धवसेना पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. जोशी यांनी सत्काराबद्दल पक्षाचे व उपस्थितांचे आभार मानले.

# पाली-सुधागड संघर्ष समितीची कार्यकारिणी जाहीर

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी|**



पाली-सुधागड परिसरातील विविध नागरी, सामाजिक व विकासात्मक प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या पाली-सुधागड संघर्ष समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. सोमवारी ( दि.१०) ऑगस्ट रोजी हाटाळेश्वर मंदिर येथे झालेल्या बैठकीत सर्वानुमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी कपिल पाटील, उपाध्यक्षपदी हनुमंत जोशी व गोविंद शिंदे, तर सचिवपदी गौसखान पठाण यांची निवड करण्यात आली. सहसचिवपदी स्वप्निल खंडागळे यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच खजिनदारपदी रविंद्र नागोठकर आणि सहखजिनदारपदी इस्माईल परबळकर यांची निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी अमित गवळे, प्रदीप खंडागळे, रोहीदास गायकवाड, किशोर चौधरी आणि सचिन तेलंगे यांची निवड करण्यात आली.

या बैठकीत पाली-सुधागड परिसरातील विविध नागरी, सामाजिक व विकासात्मक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्या सोडविण्यासाठी संघटितपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

पाली-सुधागडच्या प्रश्नांसाठी एकजुटीने आणि सातत्याने लढा देत नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी समिती अधिक सक्रियपणे काम करणार, असा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल उपस्थितांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांसाठी अंमली पदार्थ विरोधी जनजागृती

**| उरण | प्रतिनिधी |**



उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर साहेब यांनी नवीमुंबई पोलीस आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये 'नशा मुक्त अभियान' हाती घेतली असून तालुक्यातील विविध शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी पोलीसांच्या उपस्थित ड्रग्स नको, शिक्षण हवे याची शपथ घेतली. यावेळी विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम हा तरुणांना व समाजाला व्यसनापासून दूर ठेवण्याचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. भारतात केंद्र शासनाचे नशा मुक्त भारत अभियान आणि राज्य सरकारतर्फे विविध पोलीस दल व शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून ही मोहीम सध्या ठिकठिकाणी राबवण्यात येत आहे.

सदर अभियानाचा एक भाग म्हणून उरण तालुक्यातील रोटरी क्लब इंग्रजी उच्च माध्यमिक शाळा उरण, महात्मा गांधी विद्यालय दिघोडे, श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल जासई, नेटिव इन्स्टिट्यूट उरण, कोकण ज्ञानपीठ विद्यालय उरण, सिटीझन हायस्कूल उरण, उरण एज्युकेशन सोसायटी, ल. ना. भोईर महाविद्यालय नवीन शेवा, रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे, क. भा. पा. महाविद्यालय पिरकोन, अमया खोपटे तसेच इतर शाळा कॉलेजमध्ये पोलीसांच्या वतीने 'नशा मुक्त अभियान' राबविण्यात आला आहे.

**नागरिकांना जीव मुठीत धरुन प्रवास | स्थानिक रहिवासी, वाहनचालक त्रस्त**

# बेकायदेशीर आठवडा बाजारांचा धुमाकूळ

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील उरण चारफाटा, द्रोणागिरी नोड, चिरनेर, कलबुसरे आणि दिघोडे आदी ठिकाणी सिडकोच्या जागेवर बेकायदेशीर आठवडा बाजारांचा धुमाकूळ सुरू असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कोणतीही अधिकृत परवानगी आहे का, याची पर्वा न करता शासकीय मालमत्तेवर खुलेआम दुकाने थाटली जात असताना संबंधित प्रशासन मात्र, मूग गिळून गप्प का, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

आठवडा बाजाराच्या दिवशी प्रमुख रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी होते. दुकानांचे स्टॉल रस्त्याच्याकडेला तसेच वाहतुकीच्या मार्गात येत असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर अत्यावश्यक सेवा अडकल्यास एखादी गंभीर दुर्घटना घडू शकते. अनर्थ घडल्यानंतर प्रशासन जागे होणार का? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.



बाजार संपल्यानंतर परिसरात कचऱ्याचे ढिगारे, प्लास्टिक, सडलेला भाजीपाला आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरते.

स्वच्छतेची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. एकीकडे साथीच्या आजारांचा धोका असताना दुसरीकडे अशा पद्धतीने कचरा आणि अस्वच्छतेला मोकळे रान दिले जात असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या बाजारांमुळे स्थानिक रहिवासी, पादचारी आणि वाहनचालक अक्षरशः त्रस्त झाले आहे.

पदपथांवर अतिक्रमण, रस्त्यालगत बेकायदेशीर दुकाने, वाहनांची अस्ताव्यस्त पार्किंग आणि वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांचा रोजचा त्रास वाढत चालला आहे.

**कारवाईची मागणी**

आता कारवाईची वेळ आली आहे; अन्यथा नागरिकांच्या संयमाचा बांध फुटल्याशिवाय राहणार नाही. हे बेकायदेशीर आठवडा बाजार तातडीने बंद करून सिडकोची जमीन अतिक्रमणमुक्त केली नाही, तर सामाजिक संघटना रस्त्यावर उतरतील, असा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने नागरिकांच्या इशाऱ्याची गंभीर दखल घेऊन तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## निवडक

# धावीर महाराजांचा नामसप्ताह उत्साहात

**रोहा :** ब्राह्मण मंडळ रोहातर्फे आयोजित धावीर महाराजांच्या १२६ व्या वार्षिक नामसप्ताहाची सोमवारी(दि.१०) ऑगस्ट रोजी भक्तीमय वातावरणात सांगता झाली. ३ ते ९ ऑगस्ट या कालावधीत आयोजित सप्ताहात दर रोज काकड आरती, सामूहिक नामस्मरण, पालखी सोहळा, हरिकीर्तन, व्याख्याने, भजन, महिला सत्रे अशा विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी गोंदवलेकर महाराजांचे तत्त्वज्ञान या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर विविध कीर्तनकार, प्रवचनकार आणि व्याख्यात्यांनी अध्यात्म, संस्कार, संत साहित्य, योग, संतुलित जीवनशैली, कुटुंबव्यवस्था, दुर्गसंवर्धन आदी विषयांवर मार्गदर्शन केले. दररोज सायंकाळी भजनी मंडळांच्या सुरेल भजनांनी वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. महिलांसाठी आयोजित विशेष दुपारच्या सत्रांनाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भजन, प्रवचने, योगासन व आरोग्यविषयक मार्गदर्शनातून महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. सोमवारी सायंकाळी पालखी सोहळा आणि आरतीनंतर नामसप्ताहाची भक्तीपूर्ण वातावरणात सांगता झाली.





# महिलांच्या एकजुटीतून विकासाची 'उमेद'

**बोर्लीपंचतन :** जिल्हा व्यवस्थापन कक्ष, रायगड अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालिका प्रियदर्शनी मोरे यांच्या निर्देशानुसार, तालुका अभियान कक्ष, पंचायत समिती श्रीवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत दिशा महिला प्रभाग संघ, बोर्ली पंचतनची सन २०२५-२६ ची प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेहमेळावा सोमवारी (दि.१०) ऑगस्ट रोजी बोर्ली पंचतन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात उत्साहात संपन्न झाला. स्त्रीशक्तीच्या प्रेरणास्थान राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती सचिन कीर, पूजा शिंदे, वासंती गुणाजी, सुकुमार तोंडलेकर, गटविकास अधिकारी राजू किरवे, बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रफुल्ल बागल, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे विस्तार अधिकारी भरत कुबेर, स्वप्नील जाधव, दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, अबोली शेलार, अभिजीत गावडे, किशोर गोरटे, शंकर मयेकर, पत्रकार, प्रभाग संघ व ग्रामसंघांचे पदाधिकारी, ग्रामसखी तसेच स्वयंसहाय्यता समूहांच्या महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'अक्षर विद्यालयाचा इतिहास कौतुकास्पद'




**खरोशी :** वृक्षारोपण ही अक्षर विद्यालयाची एक गौरवशाली परंपरा असून वृक्ष म्हणजे केवळ निसर्ग आणि सौंदर्य नसून आपण सर्वजण घेतो तो निरोगी चवलास आहे अशी या मागची भावना झाडांच्या २६ व्या वृक्ष वाढदिवस समारंभात बोलताना पेणचे नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी व्यक्त केली. पेण येथील ईको-फ्रेंडली स्कूल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्षर विद्यालयामध्ये नुकताच पर्यावरण पुरक वृक्षारोपण उपक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी पेण नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, शाळेचे संस्थापक अध्यक्ष विजय पाटील, राहुल म्हात्रे, प्रदीप म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामचंद्र पाटील तर सूत्रसंचालन एस. जे. खरजे यांनी केले. सजावट गणेश डंगर याच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी केली. या कार्यक्रमास प्रभाकर नाईक, चंद्रकांत पाटील आदी ग्रामस्थ तसेच सामाजिक वनीकरणाचे समीर पवार, तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **पाटील अँड शेख अकॅडमी** SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल-७५५९१८४६१२
- **जन्नावर हॉस्पिटल चेंढरे** अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- **ऑफिस स्टाफ आवश्यक** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- **गाळा भाड्याने मिळेल.** ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# गरजु विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

| उरण | प्रतिनिधी |

प्राध्यापक जयदास पाटील शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, वशेणी येथील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्व. संगीता मच्छिंद्रनाथ ठाकूर फाऊंडेशनच्यावतीने गणवेश वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावणाऱ्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ मच्छिंद्र ठाकूर आणि माजी जिल्हा परिषद सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस उरण विधानसभा अध्यक्ष कुंदा ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस रायगड सरचिटणीस प्रवीण ठाकूर हे होते.

यावेळी मच्छिंद्र ठाकूर, रामदेव मढवी, नित्यानंद घरत, रतन म्हात्रे, नामदेव मढवी, हिराचंद पाटील, कोणते पाटील तसेच जयदास पाटील, अनिल पाटील, राकेश पाटील, प्रदीप पाटील, शांताराम पवार, सुशांत म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलानी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. विलास हरिभाऊ कुंभार व इतर ४ | ३२/३ | ०.४०.२० | २.५६ |
| श्री. महेंद्र पुरूषोत्तम दहिवले व इतर २ | | ०.१८.०० | १.१९ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क- हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. विलास हरिभाऊ कुंभार व इतर ४ आणि श्री.महेंद्र पुरूषोत्तम दहिवले व इतर २ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक: १२/०८/२०२६

सही/-
ॲडव्होकेट, **मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता- शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटसब, मुद्रे (बुद्रुक),
ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमधुन कायम स्वरूपी वहिवाटीचा रस्त्या संदर्भात विद्यमान मालक यांचे सोबत वहिवाटीचा करार नोंदणीकृत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| विहूर ता.मुरूड | ३४७ | जिरायत ०-२८-००<br>वरकस ०-०४-००<br>पो.ख. क्षेत्र ०-०१-५०<br>एकुण क्षेत्र ०-३३-५० | ३.६५ |

वर वर्णन जमिन मिळकतीपैकी श्री ऐजाज ताजुद्दीन पांगारकर यांचे नावे असलेले ०-०८-७५ हे. आर. क्षेत्रा मधून जाणे-येणे करीता २० फूट रूंदी असलेल्या क्षेत्राची मिळकत निरंतर वहिवाटीच्या रस्त्याकरीता करार सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. ऐजाज ताजुद्दीन पांगारकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदर रस्त्याबाबत व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळिवण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर वहिवाटीचा करारनामा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ११/०८/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी
राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. अरूण जयराम हरपुडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| २१ | ३ | ०-७०-००<br>यापैकी विकत दिलेले क्षेत्र<br>०-३५-०० | ०-६२ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १२/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### शुद्धीपत्रक

मडगाव, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, थिविम, करमळी, उडुपी, सावंतवाडी रोड आणि कारवार रेल्वे स्थानकांवर पीए प्रणालीद्वारे जिंगल प्रकारच्या जाहिरातीच्या प्रसारणासाठी **ई-लिलावाची तारीख मुळात 14.08.2026** निश्चित करण्यात आली होती, **ती आता बदलून 20.08.2026 करण्यात आली आहे**.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्यामार्फत खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **कामाचे नाव**: एसएसई/रत्नागिरी विभागांतर्गत बोगद्यांमध्ये आरसीसी फुटपाथ स्लॅबचे कास्टिंग व बसविणे, साइड ड्रेन्सची साफसफाई तसेच बोगद्यांमधील एमएस प्लेट्स काढणे व त्यांचे मजबुतीकरण करण्याचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-24, दिनांक: 12.08.2026. अंदाजित किंमत**: रु. 113,51,426/-. **ईएमडी**: रु. 2,27,000/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ**: 03.09.2026, 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी संपर्क: प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी. (वेबसाइट : **https://www.ireps.gov.in**)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) मनमोहन भीमसेन गोयल<br>२) सुधिर भीमसेन गोयल | १४ | १ | ०-५९-०० | ० | ३९ |
| | या पैकी क्षेत्र हे ० आर २९ पॉ०० मात्र. | | | | |
| | १४ | २/ब | ०-४७-५० | ० | ३१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या
समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-१२/०८/२०२६

## जाहीर नोटीस

दिनांक १२/०८/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| सर्व्हे हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ५९/१क | ०-४०-०० पैकी लिहुन देणार यांचे मालकी हक्काची ०-२०-०० एवढ्या क्षेत्राची संपुर्ण मिळकत | ०-२५ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक नीतेन विश्वंभर लालपुरिया यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही खरेदी अगर ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. यांची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### कोंकण रेल्वेवर एम-यूटीएस सहाय्यकांची नियुक्ती

मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी "कोंकण रेल्वेच्या विविध स्थानकांवर पायलट प्रकल्पाच्या आधारावर एम-यूटीएस सहाय्यकांची नियुक्ती" करण्यासाठी इच्छुक पक्षांकडून विहित नमुन्यात सीलबंद अर्ज मागविले आहेत. ही नियुक्ती मडगाव, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, थिवीम, करमळी तसेच उडुपी स्थानकांवर केवळ एम-यूटीएस उपकरणाद्वारे अनारक्षित तिकिटे जारी करण्यासाठी कमिशन देयकाच्या आधारावर करण्यात येणार असून त्यांची नियुक्ती तिकीट बुकिंग क्षेत्रात किंवा त्याच्या जवळ करण्यात येईल. **अधिसूचना क्रमांक: सीओ-16034/1/2026-सीओएमएम. दिनांक:** 12.08.2026. **अर्ज नमुन्यांची विक्री:** 12.08.2026 ते 27.08.2026. **अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:** 27.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **अर्ज उघडण्याची तारीख**: 27.08.2026 रोजी 15:30 वाजता. अधिक माहितीसाठी तसेच निविदा नमुना डाउनलोड करण्यासाठी वाणिज्य विभागांतर्गत आमच्या **www.konkanrailway.com** या संकेतस्थळाला भेट द्या. रीतसर भरलेला अर्ज कोणत्याही स्थानकावर जमा करता येईल:- 1. मडगाव, 2) रत्नागिरी, 3) चिपळूण, 4) कणकवली, 5) कुडाळ, 6) थिविम, 7) करमळी आणि 8) उडुपी.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आगरकोट, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक इंदुमती हरिश्चंद्र शेलार रा.मु.पो.रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे आशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आगरकोट ता.अलिबाग जि.रायगड | ७/२ | ०-१३-७०<br>पो.ख.०-०१-००<br>एकुण क्षेत्र ०-१४-७० | ८.२३ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ११/०८/२०२६

सही/-
**ॲड. विक्रांत विनायक पाटील**
रा. मु. म्हात्रोळी, पो.सारळ
ता.अलिबाग, जि.रायगड.
ऑफिस :- जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड
मोबाईल नं. ८३२९४६१५४०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चोंढी ता.अलिबाग | १३५ | जिरायत ०-०८-८० | १.३५ |

वर वर्णन केलेली संपूर्ण जमिन मिळकत या सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री मारूती आत्माराम म्हात्रे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ११/०८/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री.सतीश बुधाजी राठोड रा. १२०३, १२वा मजला, ए ॲन्ड ओ बेल्लेउए, आझाद रोड गुंदवली, बीएससी ऑफिस के/ई वॉर्ड जवळ, अंधेरी ईस्ट, मुंबई. ४०००६९. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु. -पै. |
|---|---|---|---|---|
| नियती जितेंद्र घाटवळ | ८१ | ३१ | ०-४५-० | ०-३६ |
| | यापैकी लिहुन देणार यांचे विक्री केलेले क्षेत्र ०-२१-० इतके मात्र | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या
समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**भुपेश तानाजी पेमारे**
(ॲडव्होकेट)
दिनांक:-१२/०८/२०२६
मो.नं.९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

**या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे-बोरीस, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, येथील (१) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-३४/१, क्षेत्र सुमारे ३३८०० चौ.मी. पैकी ३५८५ चौ.मी. (२) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-३५/२, क्षेत्र सुमारे ६५६० चौ.मी. आणि (३) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-३६/१, क्षेत्र सुमारे १६०२० चौ.मी. एकूण क्षेत्र २६१६५ चौ.मी. क्षेत्राच्या जमिनी स्प्लेन्डीड ग्लोबल एक्स्पो. लि. तर्फे डायरेक्टर पुरूषोत्तम बी. तन्वी यांच्या मालकीच्या असून, सदर जमिनींच्या मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.**

**सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पूराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता-४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक ८७, सेक्टर क्रमांक १५, सी. बी. डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमिनींच्या मिळकतीबाबतचा खरेदी-विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.**

**दिनांक : १२ ऑगस्ट २०२६**

**सही/-**
**श्री. सुनिल जे. गर्ग**
**वकील**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.अनंता गंगाराम माळी यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.अरूण परशु कडवेकर यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. मार्गाचीवाडी, ता.कर्जत, जि.रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २९ | ९ | ०-१६-०० | ०-०६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. १२/०८/२०२६.

**ॲड.शिवाजी किसन टोकरे**
पत्ता- शॉप नं.९, समर्थ कृपा
हौसिंग सोसायटी नेरळ, महेश
टॉकीज जवळ, नेरळ ता.कर्जत,
जि. रायगड पिनकोड नं.४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १२९/१४ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.६२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-१२/०८/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरती जाहिरात-२०२६

**संस्थेचे नाव :- ॐकार शिक्षण प्रसारक मंडळ - डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड. संस्था कोड** :- 272402SC015

### शिक्षक पदभरती

ॐकार शिक्षण प्रसारक मंडळ - डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड यांच्या व्यवस्थापनाकडील माध्यमिक शाळेमधील ०२ रिक्त शिक्षक पदांसाठी मुलाखतीसह व निवड प्रक्रियेतून निवड करून नियुक्ती करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून विहित मुदतीत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहेत. व्यवस्थापनाची सविस्तर जाहिरात व सविस्तर सूचना पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https://tait2025mahatteacherrecruitment.org.in या पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळास भेट द्यावी. विहित केलेल्या पात्रताविषयक अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनाचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहित मुदतीत नोंद (Lock) करावीत. तसेच पवित्र पोर्टलवरील सूचनांप्रमाणे वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | अध्यापनाचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता | आवश्यक आरक्षणनिहाय तपशील | TET/ CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | पदवीधर शिक्षक इ.९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | भाषा विषय (मराठी) | मराठी | बी.ए.,बी.एड | अनुसूचित जमाती-१<br>वि.जाती (अ) - १ | - | ०१ |
| २ | मराठी | पदवीधर शिक्षक इ.९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | समाजशास्त्र | मराठी | बी.ए.,बी.एड | | - | ०१ |
| | | | | | | | | **एकूण पदे** | | ०२ |

स्थळ - डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड.
दिनांक - १०/०८/२०२६

**अध्यक्ष / सचिव**
**ॐकार शिक्षण प्रसारक मंडळ-डिकसळ,**
**ता.कर्जत, जि.रायगड.**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

संकिर्ण अर्ज ४३/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१.श्री. राशिद मोहमेद खानजादा — अर्जदार
रा. दरबार रोड मुरुड, ता. मुरुड जि. रायगड

विरूद्ध

१. श्री. विमल चिंतामण कोळी व इतर — सामनेवाले
रा.वावे, ता.मुरुड जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मौजे वावे, ता. मुरुड, जि.रायगड येथील स.नं. १९३ ह्या मिळकतच्या कब्जेदार सदरी खरेदीखत दि.१५/०४/१९८३ अन्वये नावाची नोंद करुन मिळणेकामी अर्ज या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्यानुषंगाने या न्यायालयाकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १४९ व १५० कामकाज चालविण्यात येत आहे. सदर प्रकरणी सुनावणी नोटीस देऊनही सामनेवाले न्यायालयात उपस्थित राहिलेले नाहीत.

तरी मौजे वावे, ता.मुरुड, जि.रायगड येथील स.नं. १९३ ह्या मिळकतच्या कब्जेदार सदरी खरेदीखत दि.१५/०४/१९८३ अन्वये नावाची नोंद करणेबाबत हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दि.२७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन मौजे वावे, ता. मुरुड, जि. रायगड येथील स.नं. १९३ ह्या मिळकतीचे ७/१२ च्या कब्जेदार सदरी नोंद घेणेबाबत आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९/२ | एकूण क्षेत्र ०-५४-०० हे.आर | ०.३९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-१२/०८/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जागतिक युवा ॲथलेटिक्स स्पर्धा
# तीन पदकांसह भारताची सांगता

| युजीन | वृत्तसंस्था |

राष्ट्रीय विक्रमवीर उंच उडीपटू पूजा सिंगला अपेक्षांची पूर्तता करण्यात अपयश आले. तिला अंतिम फेरीत सातव्या स्थानी समाधान मानावे लागले. त्यामुळे जागतिक युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताला २ रौप्य व १ कांस्य अशा ३ पदकांवरच समाधान मानावे लागले.



भारतासाठी रविवारी उंच उडीत बसंत कुमारने रौप्य, तर लांब उडीत शाहनवाझ खानने कांस्यपदक जिंकले होते. शुक्रवारी आशिष यादव याने भालाफेकीत रौप्यपदक जिंकले होते. यासह भारताने २०२१ आणि २०२२ च्या आवृत्तीतील एकूण तीन पदकांच्या कामगिरीची बरोबरी केली. २००२ ते २०२८ दरम्यान भारताने या स्पर्धेत एकूण चार पदके जिंकली होती, ज्यामध्ये नीरज चोप्रा आणि हिमा दास यांच्या सुवर्णपदकांचा समावेश होता, तर २०२४ मध्ये भारताने एक पदक जिंकले होते.

दरम्यान, सोमवारी १९ वर्षांची पूजा १.८४ मीटर इतकीच उंची गाठू शकली, जी तिच्या १.९३ मीटरच्या वरिष्ठ राष्ट्रीय विक्रमापेक्षा खूपच कमी होती. तीन प्रयत्नांतही तिला १.८७ मीटरची उंची ओलांडता आली नाही. ऑस्ट्रेलियाच्या इझोबेले लुईसन-रो हिने १.९२ मीटरसह सुवर्णपदक जिंकले, तर हंगेरीच्या लिलियाना बातोरी (१.९० मीटर) आणि स्पेनच्या ऐताना अलोन्सो (१.९० मीटर) यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक पटकावले. मे महिन्यात पूजाने आशियाई युवा स्पर्धेत १.९३ मीटरच्या राष्ट्रीय विक्रमी कामगिरीसह सुवर्णपदक जिंकले होते. ती वरिष्ठ आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेतीही आहे.

दरम्यान, भारतीय महिला ४ बाय ४०० मीटर रिले संघ अंतिम फेरीत ३ मिनिटे ४५.२८ सेकंद अशी वेळ नोंदवूचन नवव्या आणि अंतिम स्थानावर राहिला.

या संघात भूमिका नेहाते, तहुरा खातून, तनू चौधरी आणि थिया अरुमुगम यांचा समावेश होता. अमेरिकेने ३:२९.१५ सेकंद वेळेसह सुवर्णपदक पटकावले, तर ऑस्ट्रेलिया (३:३१.३९) आणि ग्रेट ब्रिटन (३:३२.०८) यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक जिंकले.

थाळीफेकपटू सीमा अंतिल हिने २००२ मधील जमैका आवृत्तीत रौप्यपदक जिंकून भारताचे या स्पर्धेतील पहिले पदक जिंकले होते, तर नवजीत कौर ढिल्लाँ हिने २०१४ मध्ये अमेरिकेत कांस्यपदक जिंकले होते. २०२१ मध्ये अमित (१०,००० मीटर चालणे) आणि शैली सिंग (महिला लांब उडी) यांनी प्रत्येकी एक रौप्य जिंकले.

# अभिषेक पोरेल बलात्काराच्या आरोपात अटक
### विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून कारवाई; क्रिकेटरने आरोप लावले फेटाळून

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|

आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या बंगालचा क्रिकेटपटू अभिषेक पोरेलला बलात्कार प्रकरणी अटक करण्यात आली आहे. मंगळवारी कोलकाता येथे त्याला अटक करण्यात आली. एका वैद्यकीय विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून हे प्रकरण दाखल करण्यात आले होते, ज्यात पोरेलवर बलात्कार, गुन्हेगारी धमकी आणि इतर आरोप लावण्यात आले आहेत. पीडितेने जूनमध्ये तक्रार दाखल केली होती.

हे प्रकरण कोलकाता उच्च न्यायालयात सुरू होते. न्यायालयाने २० जुलै रोजी अटकेचे आदेश दिले होते. त्याचबरोबर आरोपीचे इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्याचे आदेशही देण्यात आले होते. अभिषेक सर्व आरोपांचा इन्कार करत आहे.



तक्रारीनुसार, महिलेने सांगितले की ती आणि अभिषेक गेल्या तीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते. गेल्या वर्षी दोघांमध्ये मतभेद सुरू झाले, त्यानंतर क्रिकेटरने तिच्यापासून कथितपणे अंतर ठेवण्यास सुरुवात केली.

महिलेने पुढे आरोप केला की अभिषेकने तिच्याशी लग्न करण्याचे वचन दिले होते, परंतु आता तो लग्नासाठी तयार नाही. तक्रारीत तिने म्हटले आहे की अभिषेकने लग्नाचे वचन देऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. महिलेने अभिषेकवर मारहाण आणि गुन्हेगारी धमकी दिल्याचा आरोपही केला आहे.

डाव्या हाताचा टॉप ऑर्डर फलंदाज अभिषेक पोरेल २०२३ पासून आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्ससाठी खेळत आहे. गेल्या हंगामात त्याने दिल्ली कॅपिटल्ससाठी चार डावांत १०८ धावा केल्या होत्या.अभिषेकने यापूर्वी इंडिया मअफ संघासोबत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचा दौरा केला आहे. त्याने २०२१-२२ हंगामात बंगालसाठी प्रथम श्रेणी पदार्पण केले होते.

त्याने आतापर्यंत ३२ प्रथम श्रेणी आणि २३ लिस्ट अ सामने खेळले आहेत.क्रिकेटर अभिषेक पोरेलने हे आरोप फेटाळून लावले आहेत. त्याने म्हटले होते की, जर त्याच्याविरुद्ध कोणतीही तक्रार दाखल केली असेल, तर ते आरोप पूर्णपणे खोटे आहेत. हे प्रकरण मोगरा पोलीस ठाण्यात २३ जून २०२६ रोजी दाखल करण्यात आले होते.

## निवडक

### बोधन सिवानंदन ब्रिटिश चेस चॅम्पियन

**नवी दिल्ली :** भारतीय वंशाची ११ वर्षीय बोधन सिवानंदन ब्रिटनची सर्वात कमी वयाची महिला बुद्धिबळ चॅम्पियन बनली आहे. तिने आयर्लंडच्या त्रिशा कन्यामरालाला रॅपिड बुद्धिबळ प्लेऑफमध्ये हरवून ब्रिटिश बुद्धिबळ चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले.बोधन व्यतिरिक्त, भारतीय वंशाच्या १७ वर्षीय श्रेयस रॉयलनेही चॅम्पियनशिप जिंकली. श्रेयसने नऊ फेऱ्यांनंतर पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थान पटकावत ओपन ब्रिटिश विजेतेपद पटकावले. १ ऑगस्ट रोजी सुरू झालेली स्पर्धा रविवारी कोव्हेंट्री येथे संपली.बोधनने कोविड महामारीवेळी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमध्ये पहिल्यांदा चेस खेळायला सुरुवात केली होती. त्यावेळी तिच्या वडिलांचा एक मित्र भारतात परत येत होता. त्याने तिला काही पिशव्या दिल्या होत्या. त्यात चेस बोर्डही होता.नॉर्थ-वेस्ट लंडनच्या या शाळकरी मुलीने त्यानंतर सलग विक्रम केले. जलद फॉरमॅटमध्ये ती आधीच यूके ओपन महिला ब्लिट्झ चॅम्पियन आणि संयुक्त ब्रिटिश महिला रॅपिड चॅम्पियन बनली आहे.क्लासिकल फॉरमॅटच्या या स्पर्धेतील विजयासह, ११ वर्षीय बोधनने तिन्ही फॉरमॅटमध्ये विजेतेपद पटकावण्याची कामगिरी केली. या चॅम्पियनशिपमध्ये तिला सहाव्या फेरीत श्रीयस रॉयलकडून एकमेव पराभव पत्करावा लागला.



### सौरव गांगुलीला जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा अध्यक्ष सौरव गांगुली आणि त्याची पत्नी डोना गांगुली यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. कोलकाता पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे. अलीकडेच सौरव गांगुली यांच्या कार्यालयात अशी दोन पत्रे आली, ज्यात या दाम्पत्याला आणि त्यांच्या जवळच्या लोकांना थेट इजा पोहोचवण्याची धमकी देण्यात आली आहे. सौरव गांगुलीला गेल्या काही महिन्यांपासून आक्षेपार्ह टिप्पणी असलेली पत्रे मिळत आहेत. गांगुलींच्या सचिवांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला असे मानले जात होते की, गांगुलींना नापसंत करणाऱ्या आणि आपला राग व्यक्त करणाऱ्या वैयक्तिक द्वेषातूनच हे घडले आहे. सोमवारी जीवे मारण्याच्या स्पष्ट धमक्या असलेली दोन नवीन पत्रे आल्यानंतर या परिस्थितीकडे गांभीर्याने घेतले गेले आणि पोलिसात तक्रार दाखल केली आहे.



### विश्वचषकाच्या रचनेवर होतेय टीका

**दुबई :** पुढील वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या आराखड्यात करण्यात आलेले बदल आंतरराष्ट्रीय क्रिकेटची विश्वासार्हता आणि सचोटी कमकुवत करणारे आहेत, अशी कडक टीका क्रिकेट स्कॉटलंड आणि रॉयल डच क्रिकेट असोसिएशन यांनी केली आहे. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात एकूण १४ देश सहभागी होणार आहेत. मात्र, नव्या रचनेनुसार १३व्या, १४व्या आणि १२व्या क्रमांकावरील संघांना सुरुवातीला पात्रता फेरीत परस्परांविरुद्ध खेळावे लागेल. या फेरीतून केवळ एकच संघ पुढे जाऊन उर्वरित १२ संघांसोबत मुख्य फेरीत प्रवेश करेल. मुख्य फेरीत या १२ संघांची प्रत्येकी सहा संघांच्या दोन गटांत विभागणी केली जाईल. स्पर्धेला १८ महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना जागतिक नियमन संस्थेने स्वरूप बदलण्याच्या घेतलेल्या निर्णयावर दोन्ही राष्ट्रीय मंडळांनी जोरदार टीका केली.



### गोविंद मोरे कबड्डी पंच परीक्षेत उत्तीर्ण

**खांदा कॉलनी :** रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी पंच परीक्षेत खांदा कॉलनी, पनवेल येथील गोविंद प्रकाश मोरे यांनी यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे झालेल्या या परीक्षेचे केंद्र आबास, पनवेल येथे होते. कबड्डी खेळाच्या क्षेत्रात पंच म्हणून काम करण्यासाठी आवश्यक असलेली परीक्षा गोविंद मोरे यांनी यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. या यशाबद्दल कबड्डी क्षेत्रातील पदाधिकारी, खेळाडू तसेच खांदा कॉलनी परिसरातील नागरिकांकडून गोविंद मोरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. भविष्यात रायगड जिल्ह्यातील कबड्डी स्पर्धांमध्ये पंच म्हणून योगदान देण्याचा मार्ग त्यांच्या या यशामुळे खुला झाला आहे.

## कॉमनवेल्थ टेबल टेनिसमध्ये पुण्याचा डंका
### दोन युवा खेळाडूंची भारताच्या संघात निवड!

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

टेबल टेनिसच्या मैदानात पुण्याच्या युवा खेळाडूंनी पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. तनीषा कोटेचा आणि सयाली वाणी यांची कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीमुळे पुण्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.




तनीषा आणि सयाली यांनी गेल्या काही काळात राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. कठोर सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि सामन्यांचा अनुभव याच्या जोरावर त्यांनी आपले स्थान मजबूत केले. त्यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांना भारतीय संघात स्थान मिळाले आहे.

टेबल टेनिसमध्ये राष्ट्रीय स्तरावर सातत्य राखणे हे खेळाडूंसाठी मोठे आव्हान असते. तनीषा आणि सयाली यांनी हे आव्हान पेलत अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. विशेषतः सयालीने महाराष्ट्रातील विविध राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये आपली छाप उमटवली आहे. दोन्ही खेळाडूंच्या यशामागे त्यांचा नियमित सराव, फिटनेसवर दिलेला भर आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळणार आहे. पुणे शहराला विविध खेळांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्याची परंपरा आहे. टेबल टेनिसमध्येही गेल्या काही वर्षांत अनेक युवा खेळाडू पुढे येत आहेत.

### अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा संपन्न

**नवी दिल्ली :** लायन्स क्लब पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा सिडको समाज मंदिर, नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. सदर स्पर्धेचे उद्घाटन प्रवीण सरनाईक आणि लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा लायन मंगला हेमंत ठाकूर यांच्या शुभहस्ते शनिवारी (दि.८) सकाळी ९.३० वाजता करण्यात आले.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

| मुंबई | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील उत्कृष्ट खेळाडू तसेच गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कामाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांना जिल्हा क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कारांतर्गत मुंबई शहर जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक असे एकूण चार पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी निलिमा अडसूळ यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी मुंबई शहर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारातील उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांनी विहित नमुन्यातील अर्ज व अधिक माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथून प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पुरस्कारांसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज ३१ ऑगस्टपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह मुंबई शहर येथे बंद लिफाफ्यात सादर करावेत.

## बॉल सोडण्याचा अन् बचावाचा सराव करतोय वैभव

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

वैभव सूर्यवंशीने डोमेस्टिक रेड-बॉल टूर्नामेंट दलीप ट्रॉफीची तयारी सुरू केली आहे. तो त्याच्या आयपीएल टीम राजस्थान रॉयल्सच्या कॅम्पमध्ये सराव करत आहे.मंगळवारी वैभवने इंस्टाग्रामवर सरावाचा व्हिडिओ शेअर केला. व्हिडिओमध्ये तो चेंडू सोडण्याचा आणि बचावाचा सराव करताना दिसला.

१५ वर्षांच्या वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा वैभव २३ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दलीप ट्रॉफीमध्ये ईस्ट झोनकडून खेळणार आहे. त्याला संघाचा उपकर्णधार बनवण्यात आले आहे. यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशन संघाचे कर्णधारपद भूषवेल.

झिम्बाब्वेविरुद्धची टी-२० मालिका संपल्यानंतर वैभवने आपले लक्ष वेगाने रेड-बॉल क्रिकेटकडे वळवले आहे. क्रिकबझच्या वृत्तानुसार, तो सध्या नागपूरमधील राजस्थान रॉयल्सच्या परफॉर्मन्स सेंटरमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

## हॉकी विश्वचषकात १९ ऑगस्टला भारत विरुद्ध पाकिस्तान
### महिला संघाचा पहिला सामना चीनशी; १५ ऑगस्टपासून स्पर्धेला सुरुवात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पुरुष आणि महिला हॉकी विश्वचषक १५ ऑगस्टपासून नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये खेळला जाईल. ३० ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या १६ संघांच्या स्पर्धेचे स्वरूप बदलले आहे. आता उपांत्यपूर्व फेरी (क्वार्टर फायनल) होणार नाहीत.भारताला पूल-डी मध्ये इंग्लंड, पाकिस्तान आणि वेल्ससोबत ठेवण्यात आले आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ १५ ऑगस्ट रोजी वेल्सविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. त्यानंतर १७ ऑगस्ट रोजी इंग्लंड आणि १९ ऑगस्ट रोजी पाकिस्तानशी सामना होईल.



विश्वचषकात एकूण १६ संघ सहभागी होत आहेत. त्यांना चार पूलमध्ये विभागले आहे आणि प्रत्येक पूलमध्ये चार-चार संघ आहेत.स्पर्धेच्या फॉरमॅटमधील सर्वात मोठा बदल म्हणजे उपांत्यपूर्व फेरी रद्द करणे. सुरुवातीच्या चारही पूल मधून टॉप-२ संघ पुढील गट टप्प्यात जातील.

म्हणजेच एकूण ८ संघ दुसऱ्या टप्प्यात पोहोचतील.दुसऱ्या टप्प्यात या संघांना दोन गटांमध्ये विभागले जाईल. त्यानंतर दोन्ही गटांमधील टॉप-२ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. अशा प्रकारे थेट दुसऱ्या गट टप्प्यातून उपांत्य फेरीचा मार्ग मोकळा होईल.

## खो-खोच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्पर्धा धडाक्यात

| मुंबई | प्रतिनिधी |

खो-खोचा भारतात वेगळा चाहता वर्ग निर्माण झाला असून यंदाचा खो-खोचा हंगाम कधी सुरू होणार, याची सर्वांनाच उत्सुकता लागून आहे. सध्या राज्यासह देशभरात पावसाने थैमान घातले असले तरी पुढील काही महिन्यांत लवकरच खो-खोचा सूर सर्व मैदानांवर घुमेल. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवर सुरळीतपणे आयोजित केल्या जाणाऱ्या खो-खो स्पर्धेची गाडी आंतरराष्ट्रीय पातळीवर, मात्र रुळावरून घसरलेलीच आहे.



एकीकडे २०२५च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूंना अद्याप राज्य शासनाकडून २.२५ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक न मिळाल्याचा मुद्दा ऐरणीवर आहेच. मात्र यामुळे खो-खोच्या जागतिक पातळीवरील प्रगतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नवी दिल्ली येथे जानेवारी २०२५मध्ये झालेल्या पहिल्या खो-खो विश्वचषकात भारताने पुरुष-महिला अशा दोन्ही गटांत विजेतेपद पटकावले. विश्वचषकात एकंदर सहा खंडांतील २३ देश सहभागी झाले होते. पुरुष व महिला अशा दोन्ही गटांत मिळून ३९ संघांत ही स्पर्धा खेळवण्यात आली. त्यावेळी वाटले की आता खो-खो मागे वळून पाहणार नाही. मात्र आता त्या घटनेला दीड वर्षे उलटली, तरी खो-खोच्या पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत संभ्रम कायम आहे.

## ठाण्याच्या बॅडमिंटन अकादमीची चर्चा थेट परदेशात!

मुंबई : ठाणे बॅडमिंटन अकादमीत आता परदेशातील युवा खेळाडूंची पावले पडू लागली आहेत. महाराष्ट्र व देशातील कानाकोपऱ्यांमधून असंख्य खेळाडूंसोबत आता जगभरातील खेळाडूही प्रगत प्रशिक्षणासाठी ठाणे बॅडमिंटन अकादमीची निवड करीत असून, अकादमीची गुणवत्ता आणि प्रशिक्षण पद्धतीला आंतरराष्ट्रीय स्तरावरही मोठी दाद मिळत आहे.

या आंतरराष्ट्रीय यशामागे मुख्य प्रशिक्षक श्रीकांत वाड यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या प्रशिक्षकांच्या समर्पित टीमचे मोलाचे योगदान आहे. मयूर घाटणेकर, अक्षय देवलकर, मितेश हाजीरनीस, राजीव गणपुले, एकेंद्र दर्जी आणि प्रसेनजीत शिरोडकर हे प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना तांत्रिक कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, सामन्याची रणनीती आणि मानसिक तयारी यांबाबत सातत्याने मार्गदर्शन करीत आहेत.

भारताच्या खेळाडूंची प्रतिष्ठा पणाला | घरच्या मैदानावर पदक मिळवण्याची संधी

# दिल्लीत रंगणार बॅडमिंटनचा महाकुंभ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतात तब्बल १७ वर्षांनंतर बॅडमिंटनच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा थरार रंगणार आहे. १७ ते २३ ऑगस्टदरम्यान नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी भारतीय खेळाडू सज्ज झाले असून घरच्या मैदानावर पदक मिळवण्याची मोठी संधी त्यांच्यासमोर आहे.

भारतीय युवा खेळाडू आयुष शेट्टी याच्यासाठी मात्र स्पर्धेची सुरुवातच मोठ्या आव्हानाने होणार आहे. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत त्याची लढत चीनचा गतविजेता आणि जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू शी यू ची याच्याशी होणार आहे. त्यामुळे या सामन्याकडे बॅडमिंटनप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे.आयुषने यापूर्वी २०२६ आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक पटकावत आपली क्षमता सिद्ध केली आहे. विशेष म्हणजे त्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही त्याला शी यू चीविरुद्धच पराभव स्वीकारावा लागला होता. आता जागतिक अजिंक्यपदाच्या पहिल्याच फेरीत पुन्हा एकदा दोघे आमनेसामने येणार आहेत.



सिंधू, लक्ष्य सेन आणि सात्त्विक-चिरागकडून पदकाची अपेक्षा

भारतीय चाहत्यांच्या नजरा केवळ आयुषच्या सामन्यावर नसून पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन आणि सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी यांच्यावरही असतील. सिंधूकडून पुन्हा एकदा मोठ्या कामगिरीची अपेक्षा आहे. लक्ष्य सेनदेखील स्पर्धेसाठी विशेष तयारी करत असून भारतीय संघाला घरच्या प्रेक्षकांचा फायदा मिळण्याची शक्यता आहे.पुरुष दुहेरीत सात्त्विक आणि चिराग ही भारताची सर्वात मोठी पदकाची आशा मानली जात आहे. जागतिक दर्जाच्या या स्पर्धेत भारताला अनेक विभागांत पदक मिळवण्याची संधी आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या आयोजनासाठी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. यापूर्वी झालेल्या इंडिया ओपनदरम्यान स्टेडियममधील परिस्थितीबाबत काही तक्रारी झाल्या होत्या. त्यानंतर आयोजकांनी वातानुकूलन, प्रकाशयोजना आणि इतर सुविधांमध्ये सुधारणा केल्याचे सांगितले आहे.१७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेचा अंतिम सामना २३ ऑगस्टला होणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस भारतीय बॅडमिंटनसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)